
भारतीय संस्कृति संरक्षक

२

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय कां. भा.
दा. क्र. २०३

# येती घरा

प्रा. कृ. शा. भिंगारकर



BVBK-0400203

बा. वा.
नों. क्र. २०३

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २०३ दिनांक ......
विषय किशोर क्र. ९१२

भारतीय संस्कृति संरक्षक

# साधु संत येती घरा

## भाग २

लेखक

डॉ. कृ. ज्ञा. भिंगारकर

एम्. ए. पीएच्. डी.

म. गं. भ. ... शाखा.
... विभाग
दा. क. २०३ दिनांक .....
विषय किशोर - ९८२..

: प्राप्तिस्थळ :

डे आणि मंडळी
लर्स व स्टेशनर्स
वंत चौक, पुणे ३०

सौ. मालिनी कुलकर्णी
२४३ बद्रिकाश्रम, १ ली खेतवाडी
अलंकार टॉकीजजवळ मुंबई ४.

किंमत : दोन रुपये पन्नास पैसे

डे कुलकर्णी प्रकाशन. पुणे. ३०.

BVBK-0400203

प्रकाशिका :

**सौ. निर्मला नारायण अरगडे**

अरगडे, कुलकर्णी प्रकाशन,

१६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०.

• • •

सर्व हक्क प्रकाशिकेच्या स्वाधीन

सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ती,

१५ ऑगस्ट १९६९

• • •

मुद्रक :

**वि. ना. भंडारे**

स्वानंद मुद्रणालय,

२०३ शनिवार पेठ, पुणे ३०.

# श्री. शं. वा. दांडेकर यांचा अभिप्राय

प्रा. कृ. ज्ञा. भिंगारकर यांनी लिहिलेल्या 'साधुसंत येती घरा' या पुस्तकाचे दोन्ही भाग वाचून पाहिले. मला आवडले.

राष्ट्राच्या उन्नतिकरिता, समाजधारणा ज्यांच्या योगाने होईल अशा 'सत्य, अहिंसा, मानवता, सेवा, प्रेम, निःस्वार्थीपणा इत्यादि सद्गुणांचे मूल्य राष्ट्रातील बालमनावर बिंबवून त्यांची जोपासना करणे अवश्य आहे.

वर उल्लेखिलेल्या सद्गुणांचे महत्त्व बालमनावर बिंबविण्याकरिता ज्या वाङ्मयाचा उपयोग करता येईल त्यात संत चरित्रास फार मोठे स्थान आहे. कारण या साधुसंतांनी ही नैतिक, धार्मिक मूल्ये आपल्या जीवनात उतरवून ती खरी आहेत व मोलवान आहेत असे जगतास दाखविले आहे. या दृष्टीने प्रा. भिंगारकर यांच्या 'साधुसंत येती घरा' या पुस्तकाचा मोठा उपयोग आहे.

लेखकांनी निवड करताना मोठी व्यापक दृष्टी ठेवली आहे. भारतातील वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या व वेगवेगळ्या प्रांतांतून होऊन गेलेल्या संतांची निवड केल्यामुळे, जाणकारपणे उपयोग केल्यास आपल्या राष्ट्राची 'एकात्मता' मुलांच्या मनावर शिक्षकास बिंबविता येईल. अशा शिक्षणाची देशास फार गरज आहे. हे दोन्ही भाग भारतीय संस्कृती संरक्षणास मदत करतील असेच आहेत.

कथांची भाषा सोपी व सरळ आहे. त्या मनोरंजक रीतीने सांगितल्या आहेत. त्यामुळे मुलांना ही पुस्तके आवडतील अशी झाली आहेत.

पंढरपूर — शं. वा. दांडेकर

आ. शु. १५ शके १८८९

# लेखकाचे मनोगत

"साधु संत यती घरा" हे पुस्तक मुख्यतः कुमारांसाठी लिहिले आहे. याच्या पहिल्या भागात उत्तर हिंदुस्थानातील सूर, तुलसी, मीरा इत्यादी संतांची चरित्रे आलेली आहेत व दुसऱ्या भागात दक्षिण हिंदुस्थानातील ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादी संतांची चरित्रे आलेली आहेत. ही सर्व चरित्रे साध्या व सोप्या भाषेत लिहिलेली आहेत. संतांच्या चरित्रातील गोष्टी सांगून शेवटी त्यांच्या उपदेशाचे सार दिलेले आहे.

संतांची चरित्रे जुनी कधीच होत नाहीत. ती नित्य नवीनच असतात. आज जीवन निराशामय झालेले आहे. जीवनावरच्या श्रद्धा नष्ट होत चाललेल्या आहेत. सर्वत्र स्वार्थ, लाच–लुचपत, लोभ वगैरे दुर्गुणांचे व दुःखांचे वातावरण पसरले आहे. अशा वेळी संत चरित्रे म्हणजे जीवनाला मार्गदर्शन करणारा नंदादीप आहे. आज विद्यार्थ्यांच्या मनावर धार्मिक संस्कार करण्याच्या दृष्टीने देखील संत–चरित्रांचा उपयोग होणार आहे. या धार्मिक संस्कारांनी व श्रद्धांनी बऱ्याच समस्या आपोआप सुटतील. त्यासाठी प्रत्येक चरित्राच्या शेवटी त्या त्या संताचा उपदेश थोडक्यात दिला आहे. विद्यार्थ्यांनी हे दोन्ही भाग अवश्य वाचून आपले चारित्र्य घडवावे व सद्‌गुणांची जोपासना करावी.

संत कोणत्याही जातीत, कोणत्याही धर्मात, कोणत्याही देशात अथवा कोणत्याही कालात जन्माला आले तरी त्यांचा उपदेश सारखाच आहे. सत्य, अहिंसा, मानवता, सेवा, प्रेम, निःस्वार्थीपणा वगैरे मानवी सद्‌गुणांचा त्यांनी वारंवार उपदेश केला. त्या उपदेशाची संपूर्ण नाही, तरी थोडीशी ओळख करून द्यावी हा या पुस्तकाचा उद्देश आहे. त्यातून जिज्ञासू विद्यार्थ्यांनी त्या त्या संतांचे ग्रंथ मुळातून वाचावेत. अशा रीतीने गोष्टीरूपाने ज्ञान देण्याचा व संस्कार करण्याचा हा प्रयत्न आहे.

—लेखक

---

## अनुक्रमणिका


१. ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर
२. तुका झालासे कळस
३. तुकारामशिष्या सन्त बहिणाबाई
४. महान प्रचारक नामदेव
५. दासो दिगंबर
६. चिन्ता करतो विश्वाची
७. तामीळ भाषेतील श्रेष्ठ सन्त तिरुवल्लुवर
८. कर्नाटकांतील तुकाराम–सन्त पुरंदरदास
९. वीरशैव संप्रदायाचा प्रसारक बसवेश्वर
१०. महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर
११ संत चोखामेळा
१२ संत रोहिदास

# १. ज्ञानियांचा राजा–ज्ञानेश्वर



हा आवाज कसला ऐकू येतोय् ? हा तर टाळांचा आवाज. भजन चाललेले दिसतंय् कुठं तरी. या, आपण पाहूंच या, काय चालले ते. अफाट गर्दी जमलीय्. टाळ मृदंगांचा आवाज ऐकू येतोय्. सारखा नामघोष चालला आहे. हे काय ? यातील प्रत्येकाचे डोळे भरून आले आहेत. अन्त:करण उचंबळून आलंय्–थांबा. आवाज थांबला. पाहू या काय आहे ते? आज कार्तिक वद्य त्रयोदशीचा दिवस आहे. ज्ञानेश्वर समाधीला बसणार आहेत. समाधीची जागा सारवून स्वच्छ केली आहे. त्यावर तुळशी अंथरल्या आहेत आणि वर ज्ञानदेव पद्मासन घालून बसलेले आहेत. प्रत्यक्ष पांडुरंग समाधीच्या सोहळ्याला आले आहेत. निवृत्तिनाथ सुद्धा रडत आहेत. "ज्ञानदेवा, अरे थोरल्या भावाच्या आधीच तू चाललास. आम्हाला सोडून जाणार तू ?"

" वरिष्ठाचे आधीं कनिष्ठाचे जाणे । केले नारायणे उफराटे " आणि ज्ञानदेव ! आत्मानंदात तल्लीन आहेत. लोकांना सन्मार्ग दाखविण्याचं अवतारकार्य संपलं. ज्ञानदेव परब्रह्मात विलीन होणार. सर्वांनी मोठ्या दुःखाने समाधीवर दगड ठेवला. दुःखाचा सागर उचंबळला. डोळ्यांतून आंसवं गळत होती. आता तो प्रेमळ ज्ञानेश्वर दिसणार नाही म्हणून मुक्ताबाई ओक्साबोक्शी रडत होती. आई–वडिलांच्या पश्चात् ज्ञानेश्वरांनीच तिचे आईवडिलांप्रमाणे पालनपोषण केले.

" आम्हा माता–पिता नित्य ज्ञानेश्वर ।
नाही आता थार विश्रान्तीसि ॥ "

ज्ञानेश्वर समाधिस्थ झाले !

था. या देवळाच्या पायऱ्यांवर बसू या. येथील दगड अन् दगड तुम्हाला ज्ञानदेवांच्या आठवणी सांगेल. येथील वस्तूअन् वस्तू ज्ञानदेवाची हकीकत सांगेल. हा पहा पिंपळ. याला सोन्याचा पिंपळ म्हणतात.

## अष्टपुत्रा सौभाग्यवती भव

एके दिवशी सकाळी एक बाई भक्तिभावने पिंपळाला प्रदक्षिणा घालीत होती. सूर्य बराच वर आला होता. अशा वेळी लांबून आलेला एक संन्यासी विश्रान्तीसाठी पारावर बसला. बाईच्या प्रदक्षिणा पुऱ्या झाल्या. सत्पुरुष आहे–दर्शन घ्यावे म्हणून बाईंनी संन्याशाचे दर्शन घेतले. " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ।" स्वामींनी आशीर्वाद दिला. " स्वामीमहाराज, हे कसं शक्य आहे ?" बाईंनी विचारले. स्वामीजी म्हणाले की, तुम्ही तर सौभाग्यवती दिसता, मग माझा आशीर्वाद का खोटा होईल ?

## विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला

बाईनी आपली सर्व हकीकत सांगितली. त्या म्हणाल्या, "माझं नाव रुक्मिणी. आळंदीच्या सिद्धोपंत कुलकर्ण्यांची मी मुलगी. माझे पती पहिल्यापासून विरक्त. एकदा गंगास्नानाला जातो म्हणून निघून गेले ते अद्यापि आलेच नाहीत." स्वामींनी पतीचे नाव, गाव वगैरे सर्व चौकशी केली. खाणाखुणा विचारल्या. मग त्यांच्या लक्षात आले की, काही दिवसांपूर्वी आपण "विठ्ठल" नावाच्या एका माणसाला संन्यास दिला. त्याने आपल्याला खोटेच सांगितले की आपले लग्न झाले नाही. काशीचे रामानंद स्वामी काशीहून रामेश्वरला जात होते. वाटेत आळंदीला मुक्काम केला. तेथे रुक्मिणीबाई व त्यांची गाठभेट झाली. आपल्या हातून संसारी माणसाला, बायको तळमळत असताना संन्यास दिला गेला, म्हणून त्यांना वाईट वाटले. त्यांनी विठ्ठलाला सांगितले की पुनः आळंदीला जाऊन गृहस्थाश्रमाचा स्वीकार कर.

## पुनः गृहस्थाश्रम

विठ्ठलपंत आळंदीला आले. त्यांनी पुन्हा गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. परंतु आळंदीच्या लोकांना हे आवडले नाही. कारण एकदा संन्यासाश्रम स्वीकारल्यावर पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारणे हे धर्मबाह्य आहे असे समजले जाई. लोकांनी विठ्ठलपंताचा छळ करण्यास सुरुवात केली. त्यांना वाळीत टाकले. त्यांच्याशी असलेले सर्व संबंध तोडून टाकले. अशा अवस्थेत विठ्ठलपंत कालक्रमणा करू लागले. त्यांना चार मुले झाली. थोरला निवृत्ती. नंतर ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई. या चारही भावंडात दोन दोन वर्षांचे अंतर होते.

## संन्याशाची मुले

हळूहळू मुले मोठी होऊ लागली. विठ्ठलपंतांनी त्यांना गीता, उपनिषदे वगैरे शिकविले. काही दिवसांनी त्यांच्या मुंजीचा प्रश्न उपस्थित झाला. आळंदीतील ब्राह्मण त्यांची मुंज करण्यास तयार नव्हते. विठ्ठलपंतांनी विचारले असता त्यांना देहान्त प्रायश्चित्त घेण्यास सांगितले. मुलांच्या मुंजी व्हाव्या म्हणून विठ्ठलपंतांनी देहान्त प्रायश्चित घेतले. चारही भावंडे पोरकी झाली. ना आई ना बाप. 'आमच्या मुंजी करून आम्हाला ब्राह्मण करून घ्या' म्हणून ज्ञानेश्वरानी आळंदीच्या ब्राह्मणांना विनंती केली, पण त्यांनी सांगितले. तुम्ही पैठणला जा. तेथील ब्राह्मणांना विचारा व त्यांनीपरवानगी दिली तर आम्ही तुमच्या मुंजी करू. "ही चारही भावंडे पैठणला निघाली. काट्याकुट्यातून आणि दाट जंगलातून त्यांचा प्रवास चालला होता. वाटेत हिंस्त्र पशूंची भीती वाटत होती, वाटेत खावयास मिळत नसे. पाय दमत असत. तरी मुंजीच्या इच्छेने इतक्या लांबचा प्रवास ह्या भावंडानी केला.

## चमत्काराशिवाय नमस्कार नाही

या मुलांसाठी पैठणच्या ब्राह्मणांनी सभा भरविली. धर्मशास्त्र आणि इतर ग्रंथ धुंडाळले. पण कुठेही संन्याशाच्या मुलांना मुंजीचा अधिकार आहे असे लिहिले नव्हते. नाइलाजाने पैठणच्या ब्राह्मणांनी सांगितले, "तुम्हाला मुंज करता येणार नाही." निराश मनाने ही चारही भावंडे परत फिरली. पैठणच्या रस्त्यातून जात असता एका खवचट ब्राह्मणाने विचारले, "काय रे, तुझे नाव काय ?" ज्ञानेश्वरांनी सांगितले, मला ज्ञानदेव म्हणतात.

"अस्सं ! हा समोरून रेडा येतो आहे ना त्याचेही नाव ज्ञानाच आहे. मग तो आणि तू सारखाच ना ?" त्या खवचट ब्राह्मणाने

विचारले. " होय महाराज ! आम्हा दोघांचा आत्मा सारखाच आहे." शांतपणे ज्ञानेश्वरांनी सांगितले. ब्राह्मण म्हणाला, " मग मी याच्या पाठीवर आसूड मारतो. त्याचा वळ तुझ्या पाठीवर उठला पाहिजे." असे म्हणून त्याने भिस्त्याच्या हातांतून आसूड घेतला आणि तो आसूड काडकन् रेड्याच्या पाठीवर मारला. मुक्ताबाईच्या डोळ्यांत पाणी तरारले; कारण ज्ञानदेवांच्या पाठीवर करंगळीएवढा वळ उठला होता. लोकांनी हे पाहिले. त्यांनाही आश्चर्य वाटले. पण त्या ब्राह्मणाला अजूनही विश्वास वाटला नव्हता. त्याने ज्ञानेश्वरास सांगितले, "तू ब्राह्मण आहेस तू वेद म्हणू शकशील, पण हा रेडा वेद म्हणू शकेल काय ?"

"हो ! का नाही ? आपल्या आशीर्वादाने रेडासुद्धा वेद म्हणू शकेल" असे म्हणून ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या मस्तकावर हात ठेवला. तो काय आश्चर्य ! ब्राह्मणाप्रमाणें अस्खलित वाणीने रेडा वेद म्हणू लागला. पैठणचे ब्राह्मण ज्ञानेश्वरांचा अधिकार पाहून आश्चर्याने थक्क झाले. त्यांनी ज्ञानेश्वरांना शुद्धिपत्र दिले. शुद्धिपत्र घेऊन चारही भावंडे परत आळंदीस आली.

## ग्रंथलेखन

आळंदीस येताना वाटेत नेवासे या गावी ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहायला सुरुवात केली. ज्ञानेश्वरीत गीतेचा अर्थ मराठीत सांगितलेला आहे. गीता संस्कृतमध्ये असल्यामुळे त्याचा अर्थ सामान्य लोकांना समजत नसे. त्यामुळे सामान्य लोकांना धर्माबद्दल माहिती मिळत नसे. संस्कृतमधील ज्ञानभांडार मराठीत आणण्याचे अवघड काम ज्ञानेश्वरांनी केले. कारण त्यावेळचे पंडित संस्कृतला देवभाषा असे मानीत व मराठीत ग्रंथरचना करणे कमीपणाचे समजत. त्याच

वेळी ज्ञानेश्वरी लिहून घेण्याचे काम सच्चिदानंदबाबा या गृहस्थाने केले. नंतर ज्ञानेश्वर आळंदीस आले.

## मडके मिळाले नाही

आळंदीच्या ब्राह्मणांना मात्र ज्ञानेश्वरांचा अधिकार पटला नव्हता. ते लोक ज्ञानेश्वरांचा अजूनही छळच करीत होते. एकदा मुक्ताबाईस मांडे खावयाची इच्छा झाली. मांडे भाजण्यासाठी मडके आणायला ज्ञानेश्वर बाहेर पडले. पण गावातल्या कोणत्याही कुंभाराने त्यांना मडके दिले नाही. कारण विसोबा खेचर नावाच्या ब्राह्मणाने तसे सांगितले होते. शेवटी ज्ञानेश्वर घरी आले. त्यांनी योगाग्नी प्रज्वलित केला. पाठ तापविली आणि आपल्या बहिणीला पाठीवर मांडे भाजण्यास सांगितले. मडक्याशिवाय ज्ञानेश्वर कसे मांडे भाजतात हे पाहण्यासाठी विसोबा खेचर तिथे आलाच होता. त्याने खिडकीतून हे सगळे पाहिले. ज्ञानेश्वरांच्या अधिकाराची त्याला खात्री पटली आणि त्याने ज्ञानेश्वरांचे पाय धरले. ज्ञानेश्वरांनी असे अनेक चमत्कार केले. त्या चमत्कारांमुळे आळंदीचे लोक त्यांना नमस्कार करू लागले.

## शेवटी कोराच राहिला

आळंदीत ज्ञानेश्वर "ज्ञानेश्वरी" सांगत असत. त्यांच्या ज्ञानेश्वरीवर आळंदीचे लोक खूष होते. रोज चिक्कार गर्दी ज्ञानेश्वरी ऐकावयास जमत असे. लोक भक्तिभावाने येत, ज्ञानेश्वरी ऐकत आणि तोंड भरून स्तुती करीत. त्यांची कीर्ती दिगंतात पसरत होती. त्यांची ही कीर्ती एका चौदाशे वर्षांच्या योग्याच्या कानावर गेली. चांगदेव त्यांचे नाव. तो ज्ञानेश्वरांना भेटायला निघाला. भेटायला जायच्या आधी पत्र पाठवावे म्हणून पत्र लिहायला बसला.

बराच वेळ विचार करूनही समजेना की, "चिरंजीव" लिहावे का "तीर्थरूप" लिहावे? तीर्थरूप लिहावे तर ज्ञानेश्वर वयाने आपल्यापेक्षा खूपच लहान आहे. बरं चिरंजीव लिहावे तर अधिकाराने खूपच मोठा आहे. खूप विचार केला. पण शेवटी कोरेच पत्र पाठविले, ज्ञानेश्वरांनी पत्र मुक्ताबाईच्या हातात दिले. कोरे पत्र पाहून मुक्ताबाई म्हणाली, "ज्ञानेश्वरा, चौदाशे वर्ष तपश्चर्या करून शेवटी हा कोराच राहिला की रे." नंतर ज्ञानेश्वरांनी त्या कोऱ्या पत्रावर ६५ ओव्यात उपदेश लिहून पाठविला. त्यालाच चांगदेव पासष्टी म्हणतात. पण तो उपदेश तरी चांगदेवाला कुठे समजत होता! तो समजावून घेण्यासाठी चांगदेव ज्ञानेश्वरांना भेटायला निघाले. चांगदेवांना आपल्या शक्तीची घमेंड होती. त्यांना वाटत होतं की मी सर्व सजीवांवर सत्ता गाजवतो; म्हणून वाघावर बसले, हातात सापाचा चाबुक घेतला आणि निघाले. ज्ञानेश्वरांनी ओळखले की चांगदेव येत आहेत त्या वेळी हीं चौघं भावडं एका भिंतीवर बसली होती. ज्ञानेश्वरांनी चांगदेवाचा गर्व दूर करायचा होता. सजीवावर सत्ता कोणीही चालवू शकेल. पण निर्जीवावर सत्ता चालविणे परमेश्वराचे काम आहे. ज्ञानेश्वरांनी भिंतीला आज्ञा केली, "बाई चल, आपल्याला चांगदेवासारख्या महान् योग्याला सामोरे जायला पाहिजे." आणि जणू काही ज्ञानेश्वरांचे शब्द ऐकल्याप्रमाणे भिंत चालू लागली. समोरून चांगदेव वाघावरून येत होते त्यांनी पाहिलं की भिंत चालत येत आहे. एकदम त्यांचा गर्व मावळला. वाघावरून खाली उतरले. नम्र होऊन ज्ञानदेवांना शरण गेले. ज्ञानेश्वरांनी त्यांना मुक्ताईच्या स्वाधीन केले. मुक्ताई गुरू आणि चौदाशे वर्षांचा म्हातारा चांगा वटेश्वर शिष्य. असा थोर अधिकार होता या चारही भावंडांचा.

## उपदेश

ज्ञानेश्वरांनी सामान्य लोकांना मार्ग दाखविण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिली. त्यात निराशा सोडून आशावादाने आणि धैर्याने जीवन कसे जगावे; अनेक संकटें, दु:खे, हाल-अपेष्टा सोसून जीवन सुखाचे कसे करावे हे सांगितले आहे. ज्ञानेश्वरी म्हणजे जीवनाचे तत्त्वज्ञान. ज्ञानेश्वरी म्हणजे मोक्षमार्गाचा वाटाड्या. ज्ञानेश्वरी म्हणजे तत्त्वज्ञानाचे नवनीत. परमेश्वर प्राप्ती करावयाची असेल तर सोपा मार्ग कोणता हे ज्ञानेश्वरीत सांगितले आहे. जीवनातील दु:खांच्या रोगावर गोड औषध ज्ञानेश्वर सांगतात. ते सांगतात कर्म करण्याचा अधिकार फक्त तुझा आहे; फलाची इच्छा धरू नको. फल परमेश्वर देईल. फलाची आशा न धरता कर्म केलेस म्हणजे ते कर्म तुला बाधणार नाही आणि कर्मांनी जीवनातील दु:खेही कमी होतील.

संन्यास म्हणजे कर्माचा त्याग नव्हे तर कर्मफलांचा त्याग, म्हणजेच खरा संन्यास. खरा संन्यासी तो की जो कर्म फलांचा त्याग करतो.

ज्ञानेश्वरीत समता आणि विश्वबंधुत्वही सांगितले आहे. आपले सुख ते व्यापक करतात. आपल्या सुखाबरोबर इतरांचे सुखही ते मागतात. अठराव्या अध्यायाच्या शेवटी त्यांचे मागणे फारच सुंदर आहे. जगातील वाईट भावना नष्ट होवोत. सर्वांना सद्‌बुद्धी दे आणि मग हे परमेश्वरा, सर्वांच्या सर्व इच्छा तू पूर्ण कर.

"दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात ॥

असा हा समता, एकता आणि विश्वबंधुत्वाचा प्रचार करणारा ज्ञानियांचा राजा ज्ञानदेव कार्तिक वद्य त्रयोदशीस आळंदी येथे समाधिस्थ झाला.

# २. तुका झालासे कळस



चला. येथून जवळच आणखी एक साधुपुरुष राहत असे. त्याचेही दर्शन आपण घेऊ. हाही वारकरी संप्रदायातीलच विठ्ठलाचा भक्त होता. हो पण या घरात गलबला कसला चाललाय्. पाहू तर या आत डोकावून.

" आई, आई अग लवकर येना ! बघ तर खरं काय काय आणलंय् ते "

" काय ग काशे , अग ओरडतेस का ? "

" अग , ही नथ बघ कशी सुंदर आहे ती ! "

' आणि , ही भरजरी पैठणी मला किती सुंदर दिसेल नाही ? साऱ्या जन्मात पाहायला मिळाली नाही. थांब , नेसतेच मी–" असं म्हणून जिजाईने पैठणीचा पदर खांद्यावर घेतला. " विठ्ठल ऽ

विठ्ठल . . . अग , थांब थांब ; हे कोणी आणलं सारं ? " तुकारामबोवांनी विचारलं.

जिजाईनं शिपायाकडे बोट दाखवलं. तो म्हणाला , " महाराज, शिवाजीराजांनी हा नजराणा पाठविला आहे. आपण तो स्वीकारावा अशी त्यांची फार इच्छा आहे. "

" नाही. हे विष माझ्याकडे नको. जा हे घेऊन आणि शिवाजी महाराजांना माझा निरोप सांगा की 'सोने रुपे आम्हा मृत्तिकेसमान'. आम्हा वैष्णवांना सोने आणि माती सारखेच वाटते. त्यांना म्हणावं की पुन : असले नजराणे पाठवू नका."–शिपाई बिचारा नाईलाजाने नजराणा घेऊन परत गेला. जिजाई आणि काशी हिरमुसली. शिपाई गेल्यावर तुकोबाला आणि विठ्ठलाला जिजाईने शिव्यांची लाखोली वाहिली.

## सुखाचा संसार

तुकाराम हे देहूगावचे राहणारे. यांच्या वडिलांचे नाव वाल्होबा आणि आईचे नाव कनकाई. लहानपणी यांचे घराणे चांगले होते. जवळ पैसाअडका होता. वयाच्या तेराव्या वर्षी वडिलांनी तुकारामाच्या गळ्यात संसार अडकविला. तुकारामबुवांच्या पहिल्या बायकोचे नाव रखुमाई. तिला दम्याचा विकार होता. म्हणून तुकारामांचे दुसरे लग्न केले. दुसऱ्या बायकोचे नाव जिजाई. तुकारामांचे पहिले काही दिवस सुखात गेले. पण सुखाचे दिवस का नेहमी राहतात ? सुखदुःखांचे चक्र नेहमी फिरत असते

## भयानक दुष्काळ

वयाच्या सतराव्या वर्षी आई-बाप वारले. पुढच्याच वर्षी तुकारामांच्या थोरल्या भावाची बायको वारली. नंतर थोरला

सावजी हाही वैतागून घर सोडून तीर्थाटनास निघून गेला. वडील भावाचे छत्रही गेले. तुकारामबुवांनी व्यापार केला. पण तो तुकारामांचा व्यापार ! व्यापारातही तोटा झाला तुकारामांचा पाय आत ओढला जाऊ लागला. तशात मोठा दुष्काळ पडला. धारण वाढली. होनास एक पायली धान्य मिळू लागले. तुकारामांचा एकुलता एक मुलगाही वारला. गुरेढोरे मेली. व्यापारात तोटा आला. शेवटी तुकारामाचे मन अगदी वैतागून गेले. त्यांचे मन देवाकडे ओढ घेऊ लागले. आपल्या अभंगात तुकाराम आपल्या हालांचे वर्णन करतात—

" दुष्काळे आटले द्रव्य नेला मान ।
स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ।।
लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे ।
वेवसाय देखे तुटी येता ।।

**कीर्तनाचा अभ्यास**

तुकारामांचे मन देवाकडे ओढ घेऊ लागले. गावात एक पडके देऊळ होते. चार लोकांच्या मदतीने ते त्यानी बांधले. दर एकादशीस तुकाराम तेथे कीर्तन करीत पहिल्यांदा कीर्तन करता येत नसे. कारण अभ्यास नव्हता. पुढे पुढे संतांची काही वचने पाठ केली आणि तुकारामबुवांनी कीर्तनास सुरुवात केली.

**संतांचा सहवास**

पुढे पुढे तुकाराबुवांचे संसारावरील लक्ष उडाले. ते पूर्णपणे विठ्ठलभक्तीत रंगले. जिजाई आणि पोराबाळांची काळजी नसे. एकान्तवासासाठी भंडाऱ्या डोंगरावर जात.तेथे तासन् तास संतांच्या ग्रंथांची पारायणे करीत. विठ्ठलाचे नामस्मरण करीत. एखादे वेळी झोप येऊ लागली तर शेंडीला दोरी बांधून वर टांगून ठेवीत.

हिसडा बसला की आपोआप जाग येई. अशा रीतीने संतांच्या सहवासात त्यांचा वेळ जात असे. पुढे पुढे एकान्तवासाची आवड कमी झाली. पण लक्ष मात्र परमार्थात होते. घराची काळजी करीत नसत. घरात पोराबाळांना खायला आहे की नाही, हे देखील पहात नसत. बिचाऱ्या जिजाईला-आवलीला मात्र त्रास होई. घरातील सगळे तिलाच पाहावे लागे. काही वेळा ती स्फुंदून स्फुंदून रडे. काही वेळा विठ्ठलाला आणि तुकारामबुवांना शिव्या देई. पण तुकारामबुवांना जेवायला घातल्याशिवाय ती कधी जेवली नाही.

**अभंगांच्या वह्या बुडविल्या**

तुकारामांचे कीर्तन अतिशय सुंदर होई. कीर्तनाला लोकांची खूप गर्दी जमे. देहू गावात रामेश्वर भट्ट नावाचा एक पढिक विद्वान होता. एका वाणगटाने कीर्तन करावे हे त्याला बघवले नाही. त्याने पाटलाकडे फिर्याद केली. आणि पाटलाने हुकूम काढला की तुकारामबुवांनी देहू गाव सोडून जावे. तुकारामबुवांना अतिशय वाईट वाटले. देहू गाव सोडून जाणार कुठे? राहणार कुठे? तुकारामबुवा अभंग रचत असत. म्हणून रामेश्वर भट्ट चिडले होते. शेवटी तुकारामबुवा निराश झाले. त्यांनी आपल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत फेकून दिल्या इंद्रायणीच्या काठावर काही न खातापिता पांडुरंगाचे चिन्तन करीत बसले. गावकरी लोक म्हणू लागले, 'तुकाराम अगदीच भोळा ! व्यवहाराचेही कागदपत्र नष्ट केले आणि आता परमार्थाचेही कागदपत्र बुडवून टाकले. तेरा दिवस तुकारामबुवा अन्नपाण्यावाचून विठ्ठलाचा धावा करीत बसून होते. असे सांगतात की तेरा दिवसानंतर त्यांच्या वहया पाण्यावर जशाच्या तशा तरंगून आल्या. वहया कोरड्या मिळाल्या. तुकारा-

तुकारामबुवांचा आनंद गगनात मावेना. शेवटी रामेश्वरभट्ट त्यांना शरण आला आणि त्यांचा आवडता शिष्य बनला. तुकाराम-बुवांच्या चौदा टाळकऱ्यांपैकी तो एक होता.

## अभंगरचना

तुकाराम कीर्तने करीत. कीर्तन करता करताच ते अभंगांची रचना करीत. ते अतिशय तन्मयतेने कीर्तन करीत असत. म्हणून त्यांच्या कीर्तनाला अतोनात गर्दी होई. कोणी कीर्तन करायला बोलावले तरी ते दुसरीकडे कीर्तन करण्यास जात. पण त्यांची कीर्तनाची शिस्त फार कडक होती. ज्या ठिकाणी कीर्तन करायचे त्या ठिकाणी मोबदल्याबद्दल काहीही घ्यावयाचे नाही. तुकाराम-बुवा म्हणतात—

> "जेथे कीर्तन करावे । तेथे अन्न न सेवावे
> बुक्का लावू नये भाळा । माळ घालू नये गळा ॥

## तुकारामबुवांचा छळ

तुकारामबुवांची कीर्ती काही दुष्ट लोकांना पाहवली नाही. काही लोक त्यांचा द्वेष करीतच होते. मंबाजी गोसावी नावाचा एक ब्राह्मण तुकारामबुवांचा द्वेष करीत असे. जेथे कीर्तन असेल— तेथल्या रस्त्यावर मंबाजी काटे पसरून ठेवीत असे. हेतू हा की लोकांनी कीर्तनाला जाऊ नये. पण तुकाराम स्वतः हाताने काटे दूर करीत असत. तुकारामबुवांचा स्वभावच मुळी असा होता की, दुष्ट माणसांशी सुद्धा चांगुलपणाने वागवे. वाईट लोकांना आपल्या चांगुलपणाने लाजवावे. लोकांनी इतका छळ केला म्हणून तुका-रामबुवांनी त्यांना कधी शिव्या दिल्या नाहीत.

## सर्वत्र समदृष्टी

तुकारामबुवा सगळं जग आपलं कुटुंब आहे असे मानीत. सगळ्यांशी आत्मीयतेने वागत. एकदा एक बाई तुकारामबुवांजवळ पातळ मागायला आली. घरात जिजाईला एकच पातळ होतं. जिजाई अंघोळीला बसली. दांडीवर पातळ वाळत होतं. तुकारामबुवांनी ते पातळ घेतले आणि त्या बाईला देऊन टाकलं. इकडे जिजाईची मात्र खूपच फजिती झाली. अंघोळ झाल्यावर बाहेर येऊन पाहते तो दांडीवर पातळ नाही. एकदा असेच एका शेतकऱ्याने तुकारामबुवांना काही ऊस दिले. वाटेत येताना मुलांनी त्यांना घेरले व ती मुले त्यांना ऊस मागू लागली, ' बुवा ऊस द्या, बुवा ऊस द्या. ' तुकारामबुवा भोळे. त्यांनी ताबडतोब त्या उसाचे तुकडे केले आणि पोरांना वाटून टाकले. घरी आले तेव्हा त्यांच्या हातांत उसाचा एक तुकडा होता. जिजाई खूप संतापली. तुकारामबुवाना शिव्या दिल्या. पण मुळचा स्वभाव का बदलू शकणार आहे ?

## सगळीकडे शिवाजीच शिवाजी

तुकारामबुवा एकादशीचे व्रत आणि पंढरीची वारी करीत. त्यांना पांडुरंगाचा साक्षात्कार झाला होता. प्रत्येक वेळी विठ्ठल त्यांच्या मदतीस धावून जात असे. एकदा शिवाजीमहाराज त्यांच्या कीर्तनाला आले. त्याच वेळी कीर्तन चालू असता शिवाजीला पकडण्यासाठी मुसलमान आले. तुकारामबुवांनी पांडुरंगाचा धावा केला. पांडुरंग मदतीला धावून आले. मुसलमान सैनिक आले तेव्हा त्यांना शिवाजी दिसलाच नाही. (काही लोकांच्या मते अनेक शिवाजी दिसू लागले). शिवाजीवरील संकट दूर झाले

## पैल आले हरी

तुकारामबुवांचे शरीर थकत चालले. पंढरीला जाण्याची तीव्र इच्छा असूनही पायांनी जाववत नव्हते. मग जाणाऱ्या वारकऱ्याबरोबर अभंग रूपाने निरोप पाठवीत आणि तो वारकरी परत येण्याची आतुरतेने चातकासारखी वाट पाहात. त्या वारकऱ्याचे दर्शन घेत व पांडुरंगाच्या दर्शनाचे समाधान मानीत. हळूहळू मृत्यूच्या सावल्या त्यांना दिसू लागल्या. परमेश्वर आपल्याला बोलवीत आहे असा भास व्हायचा. " पैल आले हरी । शंख-चक्र शोभे करी । " एके दिवशी त्यांना समजून चुकले की आपल्याला जायचे आहे. त्यांनी जिजाईचा आणि मुलांचा निरोप घेतला. अभंग म्हणत म्हणत ते इंद्रायणीच्या काठी आले. गावातले सगळे लोक जमले होते. तुकारामबुवा म्हणाले,

" आम्ही जातो आपुल्या गावा । अमुचा रामराम घ्यावा ।।
तुमची आमची हेचि भेटी । येथुनिया जन्म तुटी ।।
आता असो द्यावी दया । तुमच्या लागतसे पाया ।।
रामकृष्ण मुखी बोला । तुका जातो वैकुंठाला ।। "

असे म्हणून शके १५७१ फाल्गुन वद्य द्वितीया, सोमवार या दिवशी तुकारामबुवा वैकुंठाला गेले. लोकांचा असा विश्वास आहे की तुकाराम सदेह वैकुंठाला गेले ( कुडीसहित झाला तुका गुप्त. )

## उपदेश :

तुकारामबुवांनी अनेक अभंग रचले. त्यांचे अंग म्हणजे मराठी भाषेचे लेणे आहे. अभंगाची भाषा सोपी, सुटसुटीत व सरळ आहे आणि आत अनुभवाचे सार भरलेले आहे. म्हणून आज सुद्धा

त्यांचे अभंग आपण सुभाषितासारखे वापरतो. उदा. "असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे ॥" "पुण्य तो परउपकार, पाप ते परपीडा।", "पराचिया नारी माऊली समान।"

**देवाच्या दरबारातील समता :**

तुकारामबुवांनी भागवत धर्माचा प्रसार केला. ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला. नामदेव, एकनाथ वगैरे संतांनी इमारत उभी केली आणि मंदिरावर कळस चढविण्याचे काम तुकारामबुवांनी केले. "तुका झालासे कळस ॥"---तुकारामांनी परमार्थाचा मार्ग लोकांना दाखविला. उच्च-नीच हा भेदभाव विसरून परमेश्वराच्या दरबारी आपण सगळे एक आहोत अशी शिकवण त्यांनी दिली. परमार्थातील ढोंगाचा आणि बुवाबाजीचा त्यांना तिटकारा होता. आपल्या अभंगातून त्यांनी त्याच्यावर कोरडे ओढले आहेत. भक्तीशिवाय नुसत्या पढिक ज्ञानाची आणि ज्ञानाच्या गर्वाची त्यांना चीड होती. म्हणून एका अभंगात ते म्हणतात, "वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरांनी वाहावा भार माथा।" धर्माचे रक्षण आणि प्रसार करण्यासाठीच तुकारामबुवा पृथ्वीवर आले होते. पुढील अभंगावरून त्यांच्या अवतारकार्याची स्पष्ट कल्पना येईल.

"आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासि ॥ बोलिले जे ऋषी। साच भावे वर्ताया ॥ धर्म रक्षावयासाठी। करणे आटी आम्हासी ॥ वाचा बोलो वेद नीति। करू सन्ती केले ते ॥

असे हे तुकारामबुवा हलक्या जातीत जन्माला येऊनसुद्धा महाराष्ट्रातील जनतेचे मुकुटमणी ठरले.

• • •

# ३. तुकारामशिष्या सन्त बहिणाबाई



दा. क्र. ३
विषय किशोर क्र. ९१२

**वासरू कीर्तनाला आले**

" अरे, हे वासरू इथं कशाला आलं ? इथं माणसांना बसायला जागा नाही. त्यात आणखी वासराची अडचण कशाला ? " जमलेल्या श्रोत्यांपैकी एक म्हणाला. दुसऱ्या श्रोत्याने खरोखरच त्या वासराला बाहेर हाकललं. त्या दिवशी एकादशी होती. जयरामस्वामींचं कीर्तन होतं. त्यांचं रसाळ निरूपण ऐकण्यासाठी लोकांची नेहमीच झुंबड लागत असे. आज तर विशेषच गर्दी होती. बहिणाबाई कीर्तनाला आली होती. तिच्याबरोबर तिचं लाडकं वासरू सुद्धा होतं; पण श्रोत्यांपैकी एकाने त्या वासराला बाहेर हाकललं. वासरू जात नव्हतं. पण मारहाण करून वासराला बाहेर घालवलं. बहिणाला अतिशय वाईट वाटलं. ती रडू लागली. इकडे बाहेर गेलेलं वासरू जोरजोरात हंबरडा फोडू लागलं, त्याला कीर्तन

ऐकायला आंत जायचं होतं. जयरामस्वामींच्या कानावर ते हंबरणं गेलं. त्यांनी वासरू हाकलून देणाऱ्या श्रोत्याला सांगितलं, "अरे, येऊ दे त्याला आत. त्यालाही कीर्तन ऐकायचं असेल, पशू असला म्हणून काय झालं? एखाद्या भक्ताचा आत्मा त्याच्या शरीरात रहात असेल." वासराला आत आणण्यात आलं. त्या दिवशीचं कीर्तन फारच रंगलं. कीर्तन संपल्यावर जयरामस्वामींच्या चरणावर बहिणाने डोकं ठेवलं. बहिणाबरोबर ते वासरू होतंच आणि आश्चर्य असं की त्या वासरानं सुद्धा जयरामस्वामींच्या पायावर डोकं टेकलं. सगळ्यांना फार आश्चर्य वाटलं. जयरामस्वामींनी दोघांच्याही मस्तकांवरून हात फिरवून आनंदाने आशीर्वाद दिला. ही गोष्ट कोल्हापुरात ज्याच्या त्याच्या तोंडी झाली होती.

### नवऱ्याचा राग

ही गोष्ट कोणीतरी वेगळ्या स्वरूपात बहिणाबाईच्या नवऱ्याच्या कानावर घातली. जयरामस्वामींनी आपल्या बायकोच्या डोक्यावरून हात फिरविला हे कळल्याबरोबर तो खवळला. त्याची तळपायाची आग मस्तकाला पोचली. घरी आल्यावर त्याने बहिणाला नानाप्रकारच्या शिव्या दिल्या आणि मारायला सुरवात केली. नवऱ्याने तिला गुरासारखी बडवली आईबाप जवळच होते. पण तेही काही बोलू शकले नाहीत. गोठ्यातील गाय आणि बहिणाचं लाडकं वासरू सारखं हंबरत होतं. कारण त्यांनाही बहिणाला मारलेलं पाहवत नव्हतं. शेवटी ज्यानं आपल्या घरात आसरा दिला तो घरमालक खवळला. त्यानं मारणं थांबविलं. तो म्हणाला, "अरे तू काय माणूस आहेस का पशू आहेस ? निरपराध बायकोला इतकं मारणं शोभतं का तुला ? तुम्ही चांगली माणसं म्हणून मी घरात आसरा दिला होता. आताच्या आता

माझ्या घरातून चालता हो. असली नीच माणसं संगतीला नकोत." म्हणून तो त्यांना बाहेर काढू लागला. इतक्यात बहिणाबाईच्या आई–वडिलांनी त्या ब्राह्मणाचे पाय धरले. डोळ्यात पाणी आणून विनवलं, "आम्हाला बाहेर काढू नका. निदान दुसरी जागा मिळे-पर्यंत तरी आश्रय द्या." तोपर्यंत नवऱ्याचा रागही शांत झाला होता. बहिणाबाईच्या आईवडिलांकडे पाहून ब्राह्मणाने आश्रय दिला. नाहीतर ब्राह्मणाने हाकलून दिल्यावर जाणार तरी कुठे ?

## नातेवाकांनी फसविले

कारण बहिणाबाई मूळ कोल्हापूरची नव्हती. कोल्हापुरातील ब्राह्मणाने आपल्या ओसरीवर या लोकांना आसरा दिला होता. बहिणाबाई मूळची देवगावची राहणारी. आऊजी कुलकर्ण्यांची मुलगी. तिच्या आईचे नाव जानकी. आठव्या वर्षीच वडिलांनी एका बिजवराशी लग्न लावलं. आठ वर्षांची बहिणा शिवापूरच्या जोशाची बायको झाली. दोघांच्या वयात खूपच अंतर होतं. हिचं वय आठ वर्षांचं आणि नवऱ्याचं वय तीसच्या आसपास होतं. इकडे वडिलांना एका नातेवाइकाचं बरचसं कर्ज होतं त्याच्या-साठी भांडणं सुरू झाली आऊजी कुलकर्णी यांनी ताबडतोब जाव-याला बोलावून घेतलं. बहिणाबाई आपल्या नवऱ्यासह देवगावास आली. ती यायच्या आधीच सगळी वासलात लागली होती. आऊजी कुलकर्ण्यांच्या नातेवाइकांनी त्यांना देशोधडीस लावलं होतं.

## परमार्थाकडे ओढ

आपल्या जावयासह आऊजी कुलकर्णी बरीच गावं हिंडले. शेवटी कोल्हापूरला स्थिर झाले. तेथे एका ब्राह्मणाने आपल्या ओसरीत त्यांना जागा दिली. कोल्हापुरात रोज जयरामस्वामींची

कीर्तने आणि भागवतावर प्रवचनं होत. बहिणाबाई रोज कीर्तन ऐकायला जाऊ लागली. हळूहळू तिचा परमार्थाकडे ओढा लागला. जयरामस्वामींची कीर्तनं म्हणजे तिला पंचपक्वान्नाची मेजवानी वाटे. एकही दिवस ती कीर्तन चुकवीत नसे. एक दिवस बहिरंभटाला दृष्टांत झाला की, तुझ्याजवळची गाय तू तुझ्या ओसरीवर राहावयास आलेल्या ब्राह्मणास दे. त्याप्रमाणे बहिरंभटानें सवत्स गाय दान दिली. गाईची व वासराची सर्व सेवा बहिणाच करीत असे. पुढे पुढे तर वासराला बहिणाचा फार लळा लागला. सदा सर्वकाळ ते वासरू बहिणाबरोबर असे. रात्रीसुद्धा ते तिच्या अंथरूणाजवळच झोपत असे. गावातल्या लोकांना या गोष्टीचे आश्चर्य वाटत असे.

## वासराची प्रेतयात्रा

बहिणाला मारल्यापासून गाईने आणि वासराने चारापाण्याला तोंड लावले नाही. बहिणाच्याही पोटात अन्नाचा कण गेला नव्हता. शेवटी द्वादशीच्या दिवशी वासराने मान टाकली. बहिणाला अतिशय दुःख झाले. वासराच्या अंगावर पडून बहिणा आक्रोश करू लागली. शेवटी जयरामस्वामी आपल्या शिष्यमंडळीसह आले. त्यांनी एका सजवलेल्या गाडीत वासराला घातले. भजनी दिंड्या बोलावल्या आणि भजन करत करत त्या वासराची प्रेतयात्रा काढली. गायही प्रेतयात्रेमागून जात होती. पण बहिणाला कोण पाठविणार ? बहिणा दुःखाने मुर्च्छित होऊन पडली.

## तीन दिवसाची बेशुद्धावस्था

तीन दिवसांनी बहिणाबाई मूर्च्छेतून सावध झाली. जणू मृत्यूच्या दारातूनच परत आली. पण त्या तीन दिवसात बहिणाबाईंनी अनेक दृश्ये पाहिलीं. तिला प्रत्यक्ष पांडुरंगांनी दर्शन दिले. तीन

दिवस ती कथा-कीर्तनं ऐकत होती. तुकोबांची गोड अभंगवाणी ऐकतं होती. सावध झाल्यावर सुद्धा तिच्या कानात तुकोबांचे गोड अभंग घुमत असत. मनात सारखे ते विचार चालत असत. तिने तुकोबांच्या दर्शनाचा ध्यास घेतला.

## गुरूपदेश

सात दिवस अशा चिन्तनात गेले. सातव्या दिवशी तुकोबा स्वप्नात आले. गाईचे दूध प्यायला दिले. कानात ‘रामकृष्णहरि’ हा मंत्र सांगितला. हातात “गीता” दिली. तो दिवस कार्तिक वद्य पंचमी रविवार हा होता. बहिणाबाई म्हणते :

“ठेऊनिया कर मस्तकी बोलला । मंत्र सांगितला कर्णरंध्री ॥
कार्तिकात वद्य पंचमी रविवार । स्वप्नीचा विचार गुरूकृपा ॥

दुसऱ्या दिवशी बहिणाबाईनी ही हकीकत जयरामस्वामींना सांगितली. जयरामस्वामी म्हणाले, “मुली, तू मोठी भाग्यवान. आहेस. तुकोबारायासारखा गुरु तुला मिळाला. हळूहळू गावात सगळ्या लोकांना ही बातमी कळली. जो तो बहिणाबाईच्या दर्शनाला येऊ लागला. तिच्या नवऱ्याचा मात्र जळफळाट होऊ लागला. त्याला वाटले की, ही आता असे भक्त जमा करील. त्यांच्याबरोबर माया-ब्रह्माच्या चर्चा करील आणि मग आपल्याकडे दुर्लक्ष होईल, म्हणून तो तिचा छळ करू लागला. त्या शूद्राचा काय उपदेश घेतलास ? म्हणे स्वप्नात अनुग्रह केला. सगळं ढोंग आहे झालं. म्हणून तो तुकारामबुवांची सुद्धा निंदा करीत असे.

## शरीराचा दाह

एकदा बहिणाबाईचा नवरा असाच चिडून तिला सोडून जायला निघाला. पती सोडून गेल्यावर बहिणाबाईला काय आधार होता ?

ती रडली. तिने नानापरीने समजूत घातली. पण तो ऐकेना. शेवटी त्याचं जाणं एकाएकी रद्द झालं. कारण त्याच्या अंगाचा दाह होऊ लागला. जवळ जवळ महिनाभर अंगाची आग होत होती. पण महिनाभर बहिणाबाईने मात्र रात्रंदिवस सेवा केली. शेवटी त्याला काय वाटलं कोणास ठाऊक ? तो म्हणाला की तुकारामांसारख्या सत्पुरुषाची निंदा केल्याचंच हे फळ असेल. त्याचंच हे फळ असेल तर तुकोबा मला क्षमा करा. त्या रात्री त्याचा डोळा लागला. स्वप्नात एक ब्राह्मण आला व म्हणाला, "बाबा रे, आपल्या धर्मपत्नीचा त्याग करायला निघालास ! तिनं अपराध तरी काय केला ? ती खरी हरिभक्त आहे· तिच्या इच्छेप्रमाणे वागलास तरच तुझं कल्याण होईल " दुसऱ्या दिवशी त्याच्या शरीराचा दाह शांत झाला.

**देहूस आगमन**

बहिणाबाईच्या नवऱ्याचं मन बदललं. तो म्हणाला, "बहिणा आजपासून तू माझी गुरु, तू सांगशील त्या मार्गाने जाईन." बहिणाबाईला तुकारामांना प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा होती. बहिणा-बाई---नवऱ्यासह देहूला आली. तुकारामबुवांचं दर्शन घेतलं. अगदी स्वप्नात पाहिलेलीच मूर्ती· बहिणाबाईला अत्यंत समाधान वाटलं. ती देहूमध्येच राहू लागली. दिवसभर विठ्ठल नामस्मरण करावं व रात्री कीर्तन करावं हा तिचा दिनक्रम होता. तुकारा-मांनी स्वप्नात अनुग्रह दिला होता. पण प्रत्यक्ष मुखाने मंत्र सांगावा अशी तिची इच्छा होती. एके दिवशी तिची तीही इच्छा पूर्ण झाली. तुकारामांनी उपदेश केला. भुवयांच्या मध्यभागी अंगठ्याचा स्पर्श केला. तिची कवित्वशक्ती जागृत झाली· तिला आपले पूर्वीचे तेरा जन्म आठवत असत.

## आगीतून गाय वाचविली

नंतर तिनें अभंग रचायला सुरुवात केली तिच्या अभंगावर तुकारामबुवांच्या अभंगांची दाट छाया दिसते. तिचे अभंग रसाळ आणि प्रासादिक आहेत. तिच्यावर रामदासस्वामींचाही अनुग्रह झाला होता. मराठी स्त्री-संतात मुक्ताबाईनंतर बहिणाबाईचा नंबर लागेल. इतका तिचा अधिकार थोर होता. बहिणाबाई आणि तिचा नवरा तुकारामबुवांच्या नादी लागलेले पाहुन मंबाजी-बुवांनी फार छळ केला. त्या शूद्राला काय गुरू करता ? मला गुरू करा म्हणून तो त्यांच्या पाठीस लागला. ते ऐकत नाहीत असे पाहून त्यांना देहूत राहणे सुद्धा अशक्य केले. एकदा तर बहिणा-बाईची गाय पकडून मठात नेऊन बांधली. तिला खूप बडवलं. पण दुसराच चमत्कार घडला. मंबाजीबुवांच्या मठाला आग लागली. लोकांनी आत जाऊन ती गाय सोडविली. गाईच्या पाठी-वर वळ पाहून मात्र बहिणा गहिवरली. ती गाय मात्र शेवटपर्यंत बहिणाबाईबरोबर होती. बहिणाबाईला काशी नावाची एक मुलगी आणि विठोबा नावाचा एक मुलगा होता.

## मागील तेरा जन्मांची हकिकत

बहिणाबाईला कळून चुकले की आता आपला अन्तकाळ जवळ आला. आश्विन शुद्ध प्रतिपदेला देह ठेवायचा असं तिनं ठरवून टाकलं. मरताना मुलगा जवळ असावा म्हणून त्याला पत्र पाठवून बोलावून घेतले. आई जाणार म्हणून त्यालाही अनावर दुःख झाले. शेवटी बहिणाबाईने त्याला जवळ बोलावून सांगितले की, आज मी तुला काही महत्वाच्या गोष्टी सांगणार आहे. म्हणून तिने आपल्या तेरा जन्मांची हकीकत मुलाला सांगितली. ती म्हणाली, " मी तेराही वेळा स्त्रीजन्मात होते आणि तेरा जन्मात

तू माझा मुलगा होतास. तू मला अत्यंत सुख दिलंस. तेरा जन्मात मी माझी प्रगती केली. हा माझा शेवटचा जन्म. आता पुनर्जन्म नाही. मी मुक्त झाले. तुला मात्र अजून पाच जन्म घ्यावे लागतील पुढचे तुझे तीन जन्म काशीत होतील. चवथ्या जन्मात तू संन्याशी होशील आणि पांचव्या जन्मी मुक्त होशील."

अशा रीतीने वयाच्या बहात्तर वर्षेपर्यंत विठ्ठलाचे नामस्मरण व भक्ती करीत करीत आश्विन शुद्ध प्रतिपदेला विठ्ठलाचे स्मरण करीतच बहिणाबाई विठ्ठल स्वरूपात लीन झाली.

० ० ०

# ४. महान् प्रचारक नामदेव



## संतांची परीक्षा :

"आज आपण सगळ्यांची परीक्षा घेऊ या" मुक्ताबाई म्हणाली. नामदेवांचा गर्व दूर करण्यासाठीच ही योजना आखली होती. सगळे संत एकत्र जमले होते. परीक्षा घेण्याचे काम अर्थातच वयाने मोठे असलेल्या गोरोबा काकांच्याकडे गेले. गोरोबा काकांनी आपले थापटणे घेतले आणि प्रत्येकाच्या डोक्यावर मारायला सुरुवात केली, हेच त्याचे परीक्षा घेणे होते. सगळ्यांच्या डोक्यावर थापटणे मारले, कोणी काही बोलले नाही. सगळे गप्प बसले होते. शेवटी नामदेवाची पाळी आली. नामदेवाच्या डोक्यावर गोरोबांनी थापटणे मारले नामदेव रागावला. तो म्हणाला, "मी विठ्ठलाचा लाडका भक्त आणि हा गोरोबा कोण मला

मारणार ?" हे ऐकून सगळे संत हसू लागले. नामदेव अधिकच चिडला आणि तणतणत विठ्ठलाकडे निघून गेला.

**देव जेवला :**

नामदेवाचा अधिकार फार मोठा होता. प्रत्यक्ष पांडुरंग त्याच्याशी बोलत असत. त्याच्या भक्तीने ते संतुष्ट झाले होते. लहानपणी तर त्यांनी पांडुरंगाच्या मूर्तीला जेवायला लावले होते. एके दिवशी वडील दामाशेटी काही कामानिमित्त बाहेरगावी गेले. जाताना नामदेवाला म्हणाले, "नाम्या, उद्या मी नाही; माझ्याऐवजी देवाला तू जेवायला घालायचेस. बरं का !" छोटा नामदेव 'हो' म्हणाला. दुसरे दिवशी गोणाईने नामदेवाजवळ नैवेद्य दिला आणि 'देवाला जेवायला घालून ये' असे सांगितले. नामदेव नैवद्य घेऊन राऊळात आला. देवाच्या पुढे नैवेद्य ठेवून देव जेवतील म्हणून वाट पाहू लागला. बराच वेळ झाला देव जेवले नाहीत. दगडाची मूर्ती ती ! ती कशी जेवणार ? पण एवढे कळण्याइतका नामदेव मोठा नव्हता. त्याला वाटले, 'आपल्या वडिलाच्या हातचा नैवेद्य पांडुरंग रोज खातात आणि आज मी नैवेद्य घेऊन आलो म्हणून खात नाहीत. त्याने पांडुरंगाची विनवणी करावयास सुरुवात केली. 'देवा, नैवेद्य खा ना हो ! बाबा कामासाठी गावाला गेले आहेत. उद्या येतील ते ! ते आले, म्हणजे तेच नैवेद्य आणतील. पण आज मी आणलेला नैवेद्य तुम्हाला खायला पाहिजे. नैवेद्याचे ताट परत नेले तर आई रागावेल, बाबांनाही वाईट वाटेल. पुन्हा पाठवणार नाहीत ते मला ! तुम्ही जेवल्याशिवाय मी येथून हलणार नाही." नामदेव हट्टाने बसून राहिला पण पाषाणांच्या मूर्तीला पाझर फुटेना पांडुरंग हलेनात की बोलेनात. नामदेव चिडला व म्हणाला, "देवा, आता जेवला

नाहीस तर मात्र तुझ्या पायांशी डोके आपटून प्राण देईन," म्हणून त्याने डोके आपटण्यास सुरुवात केली. पांडुरंगाने त्याची निरागस भक्ति ओळखली. दगडाची मूर्ती हलू लागली. पांडुरंग भराभर जेऊ लागला नामदेव म्हणाला, 'हेच जर आधी जेवला असतास तर !' अशा रीतीने नामदेवांनी पांडुरंगाला आपल्या भक्तीने वश करून घेतले होते

## परमेश्वराकडे ओढ

लहानपणापासूनच नामदेवाला भक्तीचे बाळकडू मिळाले होते. पंढरपुरासारख्या क्षेत्रात जन्म झाला. आई गोणाई व वडील दामाशेटी दोघेही विठ्ठलभक्त होते. नामदेवाचे मन लहानपणा-पासूनच विठ्ठलाकडे ओढ घेऊ लागले. तो चंद्रभागेच्या वाळवंटात जाई आणि तासन् तास विठ्ठलाचे भजन करीत बसे. हळूहळू नामदेव मोठा होऊ लागला. आईवडिलांची अपेक्षा होती की, नामदेवाने आपला नेहमीचा शिंप्याचा धंदा करून कुटुंबाचे पोट भरावे. पण नामदेवाचे देवाकडचे लक्ष कमी होईना. त्याचे देवाकडचे लक्ष कमी व्हावे म्हणून वडिलांनी गोविंदशेटी सदावर्ते यांच्या मुलीशी त्याचे लग्न लावून दिले. तिचे नाव राजाई असे होते. पण नामदेवाचे देवाकडचे लक्ष कमी न होता दिवसेंदिवस वाढतच होते. दिवसभर घरी येत नसे. देवळात विठ्ठलाचे भजन करीत बसे. 'हे भजन तू सोडून दे' असे अनेक वेळा तिने सांगि-तले. पण नामदेवाने ऐकले नाही. नामदेवाचे कुटुंब १४ माणसांचे होते. नामदेवाने घरात लक्ष न दिल्यामुळे घरातील लोकांना उपासमार सोसावी लागे. दोन–दोन दिवस खायला अन्न मिळत नसे. अशा वेळी गोणाई, राजाई चिडत असत पांडुरंगाला शिव्या देत असत. अनेक वेळा भक्तांची अब्रू राखण्यासाठी पांडुरंगाने

स्वत: वाण्याच्या रूपाने येऊन त्यांच्या घरात धान्य आणून दिले होते.

### काय अहंकार गेला नाही ?

नामदेवाची भक्ती वाढत होती. पण 'मी श्रेष्ठ भक्त आहे' हा त्याचा अहंकार जात नव्हता. त्याच सुमारास आळंदीच्या ज्ञानेश्वरांची आणि त्याची भेट झाली. त्या वेळी त्याचा अहंकार दुखावला गेला. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई वगैरे लोक पंढरपुराला प्रदक्षिणा घालत होते. वाटेत नामदेव वसला होता. ज्ञानेश्वरांनी त्याचे दर्शन घेतले. त्या वेळी नामदेवाला वाटले की मी किती मोठा ! प्रत्यक्ष ज्ञानेश्वरही माझे दर्शन घेतात. हा अहंकार मुक्ताबाईला सहन झाला नाही, तिने ताडकन उत्तर दिले, "नेहमी देवाच्या सान्निध्यात असूनही तुझा अहंकार गेला नाही !'

'अखंड जयाला देवाचा शेजार । काय अहंकार गेला नाही ॥'

### पिण्डीवर पाय ठेवून झोपणारा गुरू

आणि नामदेवाचा अहंकार घालविण्यासाठीच मुक्ताबाईने परीक्षा घेण्याचा घाट घातला होता. पण गोरोबाकाकांनी डोक्यावर थापटणे मारताच नामदेव चिडला आणि तणतणत देवाकडे निघून गेला. त्याने पांडुरंगाला हे गाऱ्हाणे सांगितले. देव म्हणाले, 'नामदेवा, मुक्ताबाईचे म्हणणे बरोबर आहे. तू श्रेष्ठ भक्त आहेस पण तुझ्याजवळ अहंकार असेल तर त्या भक्तीचा काही उपयोग नाही, भक्तीला ज्ञानाची जोड पाहिजे, ज्ञानाशिवाय भक्ती कुच कामाची आहे ज्ञानासाठी तू गुरू कर. नामदेव म्हणाला, 'पण देवा, गुरू कोणाला करू ? मला योग्य गुरू आढळला नाही,' पांडुरंगाने सांगितले की, आवंढ्या नागनाथाला विसोबा खेचर नावाचे सत्पुरुष राहातात, तू त्यांच्याकडे जा. त्यांचा अनुग्रह घे

त्यांचा अनुग्रह घे. ते तुला योग्य मार्गदर्शन करतील. विसोबा खेचराला भेटायला नामदेव आवंढ्या नागनाथला आला. विसोबा खेचर त्या वेळी शंकराच्या देवळात बसले होते. नामदेवांनी आत डोकावले. त्यांना आश्चर्य वाटले. नामदेव मनात म्हणाले, 'काय पण गुरु शोधून दिलाय पांडुरंगांनी!' कारण विसोबा खेचर पिंडी-वर पाय ठेवून बसले होते. पायातील वहाणांचे तेल पिंडीवर गळत होते. जो शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून झोपतो, तो काय गुरु होण्याच्या लायकीचा आहे? असा मनात विचार करून नामदेव परत जाऊ लागले. पण तेवढ्यात विसोबा खेचरांनी त्याला हाक मारली. त्यांनी विचारले की, तुला पांडुरंगानीच पाठविले ना? तुला गुरु पाहिजे होता ना? विसोबा खेचरांनी आपल्या मनातील बरोबर ओळखले. हे पाहून नामदेवाला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, 'होय, मला देवाने पाठविले होते. पण तुम्ही पिंडीवर पाय ठेवून झोपला आहात म्हणून मी परत चाललो.'

'असं, मग आत ये. एक काम कर. मला आता उठवत नाही. तेव्हा माझे पाय घे आणि ज्या ठिकाणी शंकराची पिंडी नसेल त्या ठिकाणी ठेव' विसोबा खेचर म्हणाले.

नामदेव आत आला. त्याने विसोबा खेचरांचे पाय उचलून दुसऱ्या जागेवर ठेवले. पण तेथेही पायाखाली शंकराची पिंडी उत्पन्न झाली; त्याने ते पाय तिसऱ्या ठिकाणी ठेवले. तो तेथेही शंकराची पिंडी निर्माण झाली. नामदेवाने ज्या ज्या ठिकाणी विसोबा खेचरांचे पाय ठेवले त्या त्या ठिकाणी शंकराची पिंडी निर्माण झाली. विसोबा खेचर म्हणाले, 'बघ नामदेवा, देव नाही अशी एक तरी जागा आहे का? कुठंही पाय ठेवले तरी तेथे देव

असणारच. मग मी पाय ठेवू कुठं ?' विसोबा खेचराचे हे बोलणे ऐकून नामदेव खजील झाला. त्यांच्या अधिकाराची नामदेवाला खात्री पटली. ताबडतोब नामदेवाने त्यांचे पाय धरले. नंतर विसोबा खेचरांनी त्याला अनुग्रह दिला. नामदेवाचा गर्व नाहीसा झाला; आता राहिली फक्त शुद्ध भक्ती.

## देवाशी प्रेमाचे भांडण

परमेश्वर नामदेवांशी नेहमीं बोलत असत. नामदेव सतत त्यांच्या चिंतनात रंगून गेलेले असत. कधी कधी देवाशी ते प्रेमाने भांडणही करीत. देवाला शिव्या देत. लवाड म्हणत. एका अभंगात नामदेव म्हणतात :

'घेसी तेव्हा देसी ऐसा अससी उदार
कशास रोधू देवा तुमचे कृपणाचे द्वार
पतित पावन नाम ऐकूनि आलो मी द्वारा
पतित पावन न होसी म्हणुनी जातो माघारा'

प्रेमाचे भांडण झाले तरी देवाचा विरह नामदेवाला सहन होत नसे. एकदा ज्ञानेश्वर तीर्थयात्रेला जाण्यासाठी बोलवायला आले होते. पण देवाचा विरह होईल म्हणून नामदेव गेले नाहीत. शेवटी पांडुरंगांनी नामदेवाला ज्ञानेश्वरांबरोबर तीर्थयात्रेसाठी पाठविले आपल्या तीर्थयात्रेचे वर्णन त्यांनी तीर्थावळीच्या अभंगांत फार सुंदर केलेले आहे. विसोबा खेचरांच्या अनुग्रहामुळे आता नामदेवात खूपच बदल झाला होता. त्याचा अभिमान झडला होता. सर्वत्र त्याला देव दिसत असे. सगळ्यांशी तो समानतेच्या भावनेने वागे. एकदा एका कुत्र्याने त्याची भाकरी पळविली होती. नामदेव तुपाची वाटी घेऊन कुत्र्याच्या मागे धावले. का तर

विनतुपाची भाकरी खाऊन कुत्र्याचे पोट दुखेल. कुत्र्यालासुद्धा ते परमेश्वर मानीत.

## ज्ञानेश्वरांचे पहिले चरित्रकार

ज्ञानेश्वरांच्या सहवासात नामदेव बराच काळ होते. ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या वेळेलाही नामदेव हजर होते. नामदेवांची चार मुलेही वडिलांच्या बरोबर होती. समाधीची जागा सारवण्याचे काम नामदेवांच्यां मुलांनी केले. समाधीचा करुण सोहळा नामदेवांनी समाधीच्या अभंगांत वर्णिलेला आहे. तो वाचून आजही ती परिस्थिती डोळ्यांपुढे उभी राहते आणि वाचकांना रडू येते. नामदेव महाराज म्हणतात,

'गेले दिगंबर ईश्वर विभूति ।
राहिल्या त्या कीर्ति जगामाजी ।।
वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानी ।
आता ऐसे कोणी होणे नाही ।।
सांगतील ज्ञान म्हणतील खूण ।
नयेचि साधन निवृत्तीचे ।
परब्रह्म डोळा दावू ऐसे म्हणती।
कोणा नये युक्ति ज्ञानोबाची ।।
करतील अर्थ सांगतील परमार्थ
नये पा एकान्त सोपानाचा ।।
नामा म्हणे देवा सांगूनिया काही ।
नये मुक्ताबाई गुह्य तुझे ।।

## अभंग-रचना

महाराष्ट्रात नामदेवांचे अभंग घरोघरी म्हटले जातात. त्यांची गोडी अवीट आहे. नामदेवांनी महाराष्ट्रात भागवत धर्माचा प्रसार

केला. लोकांना भक्तिमार्ग शिकविला. या संसारातून तरून जायचे असेल तर विठ्ठल नामस्मरणाखेरीज दुसरा उपाय नाही, हे त्यांनी सांगितले. जातिजातीतील विषमता त्यांनी दूर केली. शंभर कोटी अभंग रचण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली होती. पण आज त्यापैकी दोन हजार अभंगच उपलब्ध आहेत. असे सांगतात की, अभंग रचण्याच्या कामात प्रत्यक्ष पांडुरंगांनी त्याला मदत केली होती. नामदेवांच्या घरातील सर्व माणसे अभंग रचीत असत. त्यांच्या घरात कवित्वशक्तीचे जणू वरदानच मिळाले होते. नामदेवाच्या घरातील दासी जनीने सुद्धा कित्येक अभंग रचले आहेत. नामदेव हे मराठी भाषेतील आद्य आत्मचरित्रकार मानतात. त्यांनी आपले जीवन अभंगातून वर्णिलेले आहे. नामदेवाने ज्ञानेश्वरांचे चरित्रही लिहिलेले आहे. "आदि, समाधी आणि तीर्थावळी" या तीन प्रकरणांतून गायिलेले साडेतीनशे अभंगाचे हे चरित्र फारच रसाळ आहे. आजही ते मराठी भाषेचे लेणे बनून राहिले आहे.

## पंजाबात प्रचार

ज्ञानेश्वरानंतर नामदेव बराच काळ जगले. जवळजवळ ऐंशी वर्षांचे आयुष्य त्यांना मिळाले होते. मुसलमानांची परचक्रेही त्यांनी पाहिली होती. भागवत धर्माचा प्रसार करण्यासाठी ते पंजाबात गेले होते. जवळजवळ वीस एक वर्षे ते पंजाबात राहिले. भागवत धर्माच्या प्रसारासाठी जाणारा हा पहिलाच मराठी संत होय. तेथे त्यांनी विठ्ठलभक्तीचा प्रसार केला. पंजाबात त्यांना अनेक शिष्य मिळाले. नामदेवांनी हिंदीतही अभंगरचना केली. शिखांच्या गुरु ग्रंथसाहेबामध्ये "नामदेवजीकी बानी" म्हणून नामदेवांचे काही अभंग आढळतात. नामदेवांची काही मंदिरेही पंजाबात आहेत. पूर्वीच्या काळी कोणतीही साधने उपलब्ध


नसताना नामदेवांनी उत्तरेत भागवत धर्माचा प्रसार केला व भक्तिमार्गाची ध्वजा फडकविली, याचे खरोखरच आश्चर्य वाटते. इतिहासात याला दुसरी तोड नाही.

## मृत्यू

असा हा महान भगवद्भक्त व भागवत धर्माचा प्रचारक वयाच्या ८० व्या वर्षी शके १२७२ आषाढ वद्य त्रयोदशीच्या दिवशी विठ्ठलस्वरूपात लीन झाला. त्याच्या इच्छेप्रमाणे त्याच्या अस्थी महाद्वारी पुरण्यात आल्या व त्यावर पायरी बांधण्यात आली. पंढरपुरातील ही नामदेवांची पायरी प्रसिद्धच आहे.

• • •

# ५. दासो दिगंबर



## आश्विन नसतानाही दिवाळी

दिगबरपंताच्या घरी दिवाळी चालली होती. आश्विन महिना नसताही दिवाळी चालली होती. दिवाळीपेक्षाही दसपट आनंद दिगंबरपंतांना झाला होता रोज दासोच्या आवडीचं पक्वान्न केलं जात असे. गांवातले लोक येत आणि दासोचं कौतुक करून शुभ चिंतून जात. दिगंबरपंतांना तर आनंदामुळे अस्मानसुद्धा ठेंगणं वाटत होतं. त्यांना तरी आनंद का वाटणार नाही ? आज दासो बेदरच्या बादशाहाच्या कैदेतून सुटला होता. धर्मांतराच्या तडाख्यातून वाचला होता. जणु मृत्यूच्या जवड्यातूनच सुटला

होता. दासोचे रूप आणि गुण याला कारण होते. बादशहाला वाटले की, असा सुंदर आणि चुणचुणीत मुलगा आपल्या पाक इस्लाम धर्मात यावा; म्हणून त्याचे प्रयत्न चालू होते. त्याच्या प्रयत्नाला यश देणारी धटना मध्यन्तरी घडली.

### मुलगा ओलीस ठेवला

शके १४८० च्या दुष्काळात लोक अन्नावाचून तडफडून मरत होते. दिगंबरपंतांना ते पहावले नाही. त्यांनी सरकारी कोठारे फोडून भुकेलेल्या लोकांना धान्य वाटले. ताबडतोब बादशहाचे फर्मान आले. दिगंबरपंत दासोला घेऊन दरबारात आले. बादशाह दिगंबरपंतांना म्हणाला, ' दिगंबरपंत, तुम्ही आमचे इमानी नोकर. तुमच्या ताब्यात आम्ही सरकारी गुदामे दिली. आम्हाला न कळवता ती तुम्ही भिकाऱ्यांना वाटलीत. हे बरे केले नाहीत. तुमचे इमान स्मरून आम्ही तुम्हाला कडक शिक्षा देत नाही. पण एक महिन्याच्या आत धान्याची किमत दोन लक्ष रुपये तुम्ही सरकारात भरा. तोपर्यंत तुमच्या मुलाला आम्ही ओलीस ठेवतो. एक महिन्याच्या आत पैसे भरले नाहीत तर तुमच्या मुलाला आम्ही मुसलमान करू.' ' लगेच बादशहाने दासोला कैद्येत ठेवले

### दोन लाख रुपये कसे मिळणार ?

दिगंबरपंतांना आभाळ फाटल्यासारखं झालं. एकुलता एक मुलगा आणि तोही आपल्याला पारखा होणार, त्याचं धर्मान्तर होणार, ही कल्पनाच त्यांना सहन होत नव्हती. जातांना मुला-सह गेले. येतांना मात्र एकटेच परत फिरले. दासोची आई पार्वतीबाई तर ही बातमी ऐकूनच धाय मोकलून रडू लागली. मुलगा जिवंत राहणार होता, एक अधिकारीही बनणार होता. पण स्वतःचा म्हणून नव्हे तर एक खान म्हणून आणि बादशहाने

अटही विचित्र घातली होती. दोन लाख रुपये. कोठन आणणार दोन लाख रुपये ? दिगंबरपंत श्रीमंत होते. रक्कम हजाराच्या घरातली असती तर त्यांनी भरलीही असती. पण दोन लाख रुपये कसे जमणार ? त्यांनी खूप खटपट केली. पण दोन लाख रुपये जमले नाहीत. दिगंबरपंत निराश होऊन दैवाला हात लावून बसून राहिले. महिन्याची मुदत संपायची ते वाट पहात होते.

## आता दत्तच सोडविणार

इकडे दासो कैदेत होता. कोणी सुटका करायला येईल काय म्हणून वाट पहात होता. त्याला माहीत होते की, दिगंबरपंत आपल्याला सोडवू शकणार नाहीत. शेवटी त्याचे मन दत्ताच्या भक्तीकडे झुकू लागले. घरात दत्ताची उपासना होतीच. बालपणी मनावर संस्कारही झाले होते. तो कैदेमध्ये दत्ताचे ध्यान करीत असे. तेथून जवळच 'झरणी नरसिंह' नावाचे दत्ताचे स्थान होते. रोज शिपायांच्या पहाऱ्यात तो तेथे जाई. स्नान, संध्या व दत्ताची पूजा करी. बादशहाकडून मिळणारा एक रुपाया तेथील भिकाऱ्यांना देऊन टाके. तासन् तास दत्ताचे चिंतन करून तो दत्ताशी एकरूप झाला होता. आपल्या सुटकेसाठी तो दत्ताची प्रार्थना करी.

## दासोची सुटका

काळ कोणासाठी थांबत नव्हता. भराभर दिवस जात होते. महिन्याची मुदत संपली. दिगंबरपंतांना पैसे भरता आले नाहीत. बादशहाने दासोला बाहेर काढले. त्याला बाटविण्याच्या धार्मिक विधीची तयारी सुरू झाली. दरबार भरला. दासोला बाटविण्यासाठी बाहेर आणण्यात आले. एवढ्यात सभेतील एक माणूस उठला. दत्ताजी पाडेकर त्याचे नाव. तो म्हणाला, "खाविंद

मी भरतो दोन लाख रुपये याला तुम्ही सोडून द्या." हातचे सावज सुटून जात आहे म्हणून बादशहा चरफडला. पण त्याचा नाइलाज झाला. दासोला सोडण्यावाचून गत्यंतर नव्हते. त्याने दासोचा बहुमान करून त्याला सोडून दिले.

## दासो घर सोडून गेला

दिगंबरपंतांच्या आणि पार्वतीबाईंच्या आनंदाला पारावर उरला नाही. रोज घरात दिवाळी होऊ लागली. आनंद साजरा केला जाऊ लागला. दासोच्या आवडीची गोडधोड पक्वान्ने केली जाऊ लागली पण कशातही दासोचे लक्ष नव्हते. दासो आता पूर्ण बदलला होता. त्याचा खेळकरपणा नाहीसा झाला होता. तो विरक्त बनला. त्याला कळून चुकले की, दत्ताशिवाय आपल्याला सोडविणारे कोणी नाही. आपल्याला या मोहपाशातून सुटावयाला पाहिजे म्हणून एके दिवशी मध्यरात्री आई-वडील, बायको या सर्वांना सोडून भरल्या संसारातून दासो उठून गेला.

## तपश्चर्या

दासो खूप क्षेत्रे हिंडला. दत्ताची उपासना केली. शेवटी दासो सह्याद्रीतल्या सिद्ध क्षेत्रात आला. दत्ताचे जागृत स्थान होते ते. तेथील निसर्गाने दासो मोहावून गेला. ती त्याने आपली तपोभूमी निश्चित केली. बारा वर्षे तपश्चर्या केली. शेवटी दत्तांचा दृष्टांत झाला की, तू गोदातीरी राक्षसभुवनला जा. तेथे वाळवंटात माझ्या पादुका पुरलेल्या आहेत, त्या घे आणि उरलेले आयुष्य सुखात काढ.

दासो धावतच राक्षसभुवनला आला. वाळवंट त्याने उकरले. तेथें त्याला पादुका सापडल्या. त्याची तपश्चर्या आज फळास आली होती. कष्टांचे सार्थक झालं होतं. कारण साक्षात् दत्तगुरूंच्या पादुका त्याला मिळाल्या होत्या. त्याने त्या धुतल्या. त्यांची पूजा

केली. त्या मस्तकी लावल्या. तो तेथेच दत्ताची उपासना करीत राहू लागला. तेथे राहण्यात काही तरी ईश्वरी संकेत होता.

## पिता-पुत्रांची भेट

एके दिवशी व्याघ्रेश्वराच्या देवळातून दासोने एक दृश्य पाहिले. दोन स्त्रिया व एक म्हातारा पुरुष लवाजम्यानिशी तेथे आला. कसल्या तरी धार्मिक विधीची तयारी चालली होती. दासोने लांबून हे पाहिले. त्याच्या स्मृती चाळविल्या गेल्या. चेहेरे ओळखीचे वाटत होते, त्याने गावातील उपाध्यायाला विचारले, 'काय हो, कोण ही मंडळी ? कशासाठी आली आहेत ?' उपाध्यायाने सांगितले, "दुर्दैवी आहेत बिचारी. ही तरणी बाई दिसते ना तिचा पती आज पंधरा वर्षे बेपत्ता आहे. म्हणून ती आपली सौभाग्य लेणी उतरण्यासाठी आली आहे." दासोच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्याने उपाध्यायाच्या हाती निरोप पाठविला की, त्यांना म्हणावं धार्मिक विधी करायच्या आधी येऊन जा. उपाध्यायाने दिगंबरपंतांना सांगितले की येथे एक सत्पुरुष राहतात. त्यांनी तुम्हाला भेटायला बोलविले आहे. धार्मिक विधी उरकायच्या आधी जाऊन या. कदाचित ते तुमचा मुलगा परतही देतील. दिगंबरपंत सत्पुरुषाला भेटायला गेले. पिता-पुत्रांची दृष्टिभेट झाली 'बाबा' म्हणून दासोने वडिलांच्या पायाला मिठी मारली. आईला आपला मुलगा मिळाला म्हणून आनंद झाला. दासोच्या बायकोच्या आनंदाचं काय सांगावं ! ती तर वैधव्याच्या उंबरठ्यावरून परत फिरली होती. दिगंबरपंत म्हणाले, 'दासो, आता घरी चल. आम्ही पिकली पाने झालोत. घराचा कारभार तू सांभाळ.' दासो म्हणाला, "मी तुमच्याबरोबर येतो, पण आता त्या गावात राह्यचे नाही. दुसऱ्या कोणत्याही गावी

जाऊन राहू." दिगंबरपंतांना दासोचा स्वभाव माहीत होता. त्यांनी ताणून धरले नाही. ते म्हणाले, 'ठीक आहे.' त्यांनी आपले घरंदार कारभाऱ्याच्या नावे करून दिले. एका क्षणात ते निष्कांचन झाले.

### आंबेजोगाईस आगमन

पुढे ते सर्वही आंबेजोगाईस गेले. संसाराचा सर्व भार दत्त गुरूवर टाकला होता. आंबेजोगाईस सितोपंत नावाचे गृहस्थ होते. ते त्या गावचे देशपांडे होते. प्रतिष्ठित व वजनदार गृहस्थ. सितोपंत धार्मिक होते पण अंधश्रद्ध नव्हते. त्यांनी अद्याप कोणालाही गुरु म्हणून मानले नव्हते. त्यांचा असा निश्चय होता की, जो माझी पहिल्या भेटीत समाधी लावील त्यालाच मी गुरु करीन. आपल्या गावात एक सत्पुरुष आले आहेत. त्यांची व्यवस्था करणे आपले काम आहे म्हणून सितोपंत दासोपंतांच्या दर्शनास गेले. दासोपंतांनी सितोपंतांकडे पाहिले. नजरेला नजर भिडली. दासोपंतांच्या नजरेतून काही तरी दिव्य, अद्‌भूत सितोपंतांच्या नजरेत गेले तो सुखाचा क्षण कवळून नेत्रांचे शिपले मिटले गेले. सितोपंत घटकाभर त्या सुखसागरात डुंबत होते. डोळे उघडले. चेहऱ्यावर अलौकिक सुखाची छटा दिसत होती. तात्काळ सितोपंतांनी दासोपंतांचे पाय धरले आणि म्हणाले, "आजपासून आपण माझे गुरु. हे गाव सोडून आपण जाऊ नये. आपली सर्व व्यवस्था मी करतो. दासोपंतांनी मान्यता दिली. सितोपंतांनी त्यांच्यासाठी स्वतंत्र वाडा बांधून दिला. घरात कपड्यांचे व धान्याचे ढीग येऊन पडले. दोन नोकर दिमतीस दिले. अशा रीतीने संसाराचा प्रश्न दत्तगुरूंनी सोडवला.

### दासोपंतांची पासोडी

आंबेजोगाई म्हणजे व्याघ्रेश्वरीचे स्थान. दासोपंतांना ते स्थान

फार आवडले. ते तेथेच राहू लागले. जीवनाला स्थिरता प्राप्त झाली. त्यांनी सरस्वतीची सेवा करण्यास सुरुवात केली. इतक्या दिवस अनेक कल्पना, अनेक विचार मनात गुंजी घालीत असत. पण त्यांना शब्दांचे रूप प्राप्त झालं नव्हतं. आता एकेक विचार आणि कल्पना शब्दबद्ध होऊ लागली. प्रथमतः त्यांनी गीतेवर भाष्य लिहिले. गीतेचा अर्थ सामान्य लोकांना सोप्या व सुटसुटीत भाषेत त्यांनी सांगितला. जवळजवळ दोन वर्षे ही काव्यरचना चालू होती. ह्याची ओवीसंख्या सागरासारखी अफाट आहे. म्हणून या ग्रंथाला 'गीतार्णव' नाव दिले. दासोपंतांना लिहिण्याचा खूप हव्यास होता. दररोज ढब्बू पैशाची शाई संपविण्याचा त्यांचा नेम होता. एकट्या गीतेवरच दासोपंतांचे पाच ग्रंथ आहेत. त्यांनी लहान-मोठे मिळून अठ्ठेचाळीस ग्रंथ लिहिले. त्यांतील काही अप्रकाशित आहेत. यावरून त्यांच्या अलौकिक कवित्वाची साक्ष पटते. सध्या नुकतीच सरकारने 'दासोपंतांची पासोडी' प्रसिद्ध केली.

## समाधी

दासोपंत हे नाथसंप्रदायी होते. दत्ताचे एकनिष्ठ उपासक होते. त्यांनी दत्ताची कित्येक पदे लिहिली. ती पदे गोड व भावपूर्ण आहेत. त्यांनी आपला शिष्यसंप्रदाय वाढविला नाही. त्यांचे काहीच शिष्य होते. एवढी ग्रंथसंपदा लिहून त्यांनी मराठी भाषेवर उप-कार केले. मराठी भाषेला विविध प्रकारची लेणी घातली. असा हा शारदेचा मुकुटमणी, अफाट ग्रंथरचना करणारा कवि आणि एकनिष्ठ दत्तभक्त वयाच्या ६५ व्या वर्षी समाधिस्त झाला; शके १५३७ च्या माघ वद्य षष्ठीला त्यांचा आत्मा दत्तस्वरूपात विलीन झाला.

• •

# ६. चिन्ता करता विश्वाची



## नवरा मुलगा पळाला

"शुभ मंगल सावधान" भटजींनी तिसरे मंगलाष्टक संपवून चवथे म्हणण्यास सुरुवात केली. इतक्यात "अरे नवरा मुलगा पळाला, धरा धरा" असा ओरडा झाला. आई धावली, थोरला भाऊ धावला, शोधाशोध झाली. पळापळ सुरू झाली. सारेजण नवऱ्या मुलाला शोधायला धावले. पण नवरा मुलगा सांपडला नाही. आईला तर आकाश फाटल्यासारखे झाले. कुठं गेला माझा मुलगा ? ज्या घरात लग्नघरातील आनंदाचं वातावरण होते त्याच घरात आता दुःखाचं साम्राज्य पसरलं !

## जन्म व बालपण

लग्नाच्या बोहल्यावरून पळून जाणारा हा नवरा मुलगा कोण होता ? माहीत आहे तुम्हाला ? हाच तो जांब गावच्या सूर्याजी

ठोसरांचा मुलगा नारायण. शके १५३०मध्ये रामनवमीच्या दिवशी त्याचा जन्म झाला. लहानपणीच वडील वारले. नारायण बालपणी अतिशय हूड व खोडकर होता. बालपणापासूनच रामाच्या दर्शनाची आणि लोकांच्या कल्याणाची ओढ होती. रामदर्शनासाठी आणि वडिलांच्या अनुग्रहासाठी यांनी खूप प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही. लोकांच्या कल्याणाची धडपड लहानपणापासूनच चालली होती.

## चिन्ता करतो विश्वाची

एके दिवशी–सकाळपासून नारायण बेपत्ता होता. दुपारी जेवणाच्या वेळी शोध सुरू केला. श्रेष्ठ आणि आई यांनी सारा गाव पालथा घातला. नारायणाच्या नेहमीच्या बसावयाच्या जागा पाहिल्या. रामाची–मारुतीची मंदिरे पालथी घातली. पण नारायण सापडला नाही. गावात सगळीकडे शोध केला. आईच्या तोंडचे पाणी पळाले. आई व श्रेष्ठ न जेवता दिवसभर शोधत होते. शेवटी शोधून शोधून थकले. संध्याकाळी काही तरी वस्तू काढायला म्हणून आई अडगळीच्या खोलीत गेली. तेथे माणसाची आकृति दिसली. आईने विचारले, 'कोण आहे ?'

'मी आहे नारायण' नारायणाने उत्तर दिले. आईला नारायण सांपडल्याचा अतिशय आनंद झाला. तिने विचारले, 'नारायणा, किती शोधले रे तुला. आणि तू या अडगळीच्या खोलीत बसून काय करतोस ?'

'आई, चिन्ता करतो विश्वाची'–नारायणाने उत्तर दिले. लहानपणापासूनच या मुलाला जगाची चिन्ता करण्याचे वेड होते.

## देशाची दुर्दशा

नारायण मोठा होत होता. आईला वाटत होते की नारायणाचे लग्न व्हावे. पण नारायण लग्नाला तयार नव्हता. शेवटी

श्रेष्ठांनी आणि आईने मिळून लग्नाचा घाट घातला. पण भट-जींच्या तोंडून "सावधान" शब्द ऐकल्याबरोबर नारायण सावध होऊन लग्नमंडपातून पळून गेला. नंतर गोदावरीच्या तीरावर पंचवटीजवळ टाकळी येथे त्याने तपश्चर्या केली, बारा वर्षे तप-श्चर्या चालली होती. तेरा कोटी गायत्रीचा आणि "श्रीराम जयराम जयजयराम" या मंत्राचा जप झाला. नंतर श्रीराम-चंद्राचे दर्शन होऊन, त्यांचा अनुग्रह झाला. सभोवती काय चालले आहे हे त्यांना दिसतच होते पण साऱ्या हिंदुस्थानची परिस्थिती पाहण्यासाठी नारायणाने हिंदुस्थानचा पायी प्रवास आरंभला. नारायणाचा आता रामदास स्वामी झाला होता. त्यांनी पायी प्रवास केला. पण त्या वेळची हिंदुस्थानची हलाखीची स्थिती पाहून त्यांचं मन विषण्ण झालं. अन्तःकरण पिळवटून निघालं. कारण खरोखरीच हिंदुस्थानात अंधाधुंदी माजली होती. हिंदुचा फार छळ होत होता. लोकांना खायला मिळत नव्हते, राहायला जागा नव्हती. बायकांच्या शीलाच्या सुरक्षितपणाची खात्री नव्हती. कित्येक लोक मृत्युपंथाला लागले होते. कित्येकांनी तर आत्महत्त्या केल्या. नगरेच्या नगरे ओस पडू लागली. मुसलमान लोक हिंदूंच्या बायका पळवीत, त्यांना भ्रष्ट करीत व विकत असत. बरं ब्राह्मणांनी तरी उपदेश करावा. पण ब्राह्मण आपले गुरूपद गमावून बसले. शूद्र लोक उपदेश करू लागले. लोक पिराला जात. दावलमलकाच्या भजनी लागत. रामदासांना कोठूनही आशेचा किरण दिसला नाही. त्या वेळचे सन्त निवृत्ती-मार्गाचा उपदेश करीत. संसार असार आहे. ही सगळी माया आहे. खायला मिळालं नाही ना? मग उपास करणं चांगलं. देवानं आपल्याला दरिद्री ठेवलं हे एक प्रकारे चांगलंच झालं.

कारण जितकी दु:खं आपल्यावर येतील तितके आपण ईश्वराच्या जवळ जाऊ. रामदासांना असल्या उपदेशाची तिडीक आली. याच्यातून आपण चांगलं निर्माण करावं. लोकांना प्रवृत्तिमार्गाचा उपदेश करावा. हिंदूचं राज्य आणावं असा त्यांनी निश्चय केला. आपल्या कामाची दिशा आखली स्वत: संसार न करता बोहल्यावरून पळून गेलेल्या नारायणाने इतरांचे संसार सुखी करण्याचा ध्यास घेतला.

## आईची भेट

पण नवीन कामाला सुरुवात करण्याच्या आधी आईची भेट घ्यावी म्हणून ते आपल्या गावी आले. दुसऱ्या दिवशी सकाळी घरी आले. "जय जय रघुवीर समर्थ" कोणीतरी भिक्षेकरी आला असेल म्हणून वहिनी बाहेर पाहावयास आल्या. श्रेष्ठ पूजा करीत वसले होते. भिक्षा आणण्यासाठी म्हणून वहिनी आत जाऊ लागली. समर्थांनी विचारले, 'वहिनी ओळखले नाहीस मला?" वहिनी तरी कशी ओळखाणार ? दाढी वाढलेली, अंगात भगवी कफनी घातलेली. नंतर मात्र वहिनींनी निरखून पाहिले. वहिनी आश्चर्याने म्हणाल्या, 'भावोजी, तुम्ही ! किती बदललात हो !" इतक्यात श्रेष्ठही बाहेर आले. रामदासांनी पायांवर डोके ठेवले. आत आई वाट पहात होतीच. पण चोवीस वर्षे नारायणासाठी रडून रडून तिचे डोळे गेले, समर्थ धावत आत आले व आईच्या पायांना मिठी मारली. "आई, मी आलोय." 'आलास, ये बाबा नारायणा, तुझीच वाट पहात होते. किती मोठा झालास रे, अन् हे काय दाढी पण वाढविलीस का ?" समर्थांचे शरीर चाचपत आई म्हणाली. 'नारायणा, तुला एकदा डोळे भरून पाह्यचं होतं रे, पण काय करू देवाने डोळे नेले.'

"आई तुला पाहृयचय का ? थांब, तुला डोळे देतो. म्हणून समर्थांनी आईच्या डोळ्यांवरून हात फिरविला. हात फिरवताच आईला दिसू लागले. आईने डोळे भरून नारायणाला पाहिलं. नंतर आईने नारायणाला विचारले, "नारायणा, ही जादू तू कुठं शिकलास रे की हात फिरवल्याबरोबर मला डोळे आले. का भूत-बीत प्रसन्न करून घेतलेस ?" समर्थ म्हणाले, "होय आई, मी भूत वश करून घेतले. जे कौसल्येच्या कुशीत होते. अयोध्येत वावरत होते तेच भूत बरं."

होते वैकुंठीचे कोनी । शिरले अयोध्या भुवनी ।।
लागे कौसल्येच्या स्तनी । तेचि भूत गे माय ।।
सर्वां भूतांचे हृदय । नाम त्याचे रामराय
रामदास नित्य गाय । तेचि भूत गे माय ।।

## देशजागृतीचे कार्य

नंतर आईची परवानगी घेऊन रामदास कार्याला लागले. लोकांना प्रवृत्तिमार्गाचा उपदेश केला. तरुणांना स्फूर्ति दिली, जागोजागी मारुतीची स्थापना केली, तालमी उघडल्या, मठांची स्थापना केली. रामदासांच्या मठांत शिष्यांना शिस्त फार कडक असे. सबंध हिंदुस्थानात रामादासांचे एकूण ११०० मठ होते. त्यांनी लोकात जागृती केली. त्यांना प्रवृत्तिमार्गाची शिकवण दिली. त्यांना सांगितले की, आधी प्रपंच नीट करा आणि मग परमार्थाकडे वळा.

"आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका
तेथे आळस करू नका । विवेकी हो ।"

त्यांचे लक्ष तरुणांकडे होते, तरुणांना त्यांनी शिष्य केले. त्यांनाच त्यांची परीक्षा घेऊन मठाधिपती केले. त्यांना समर्थांचे हेच सांगणे

असे की, लोकसंग्रह करा. लोकांना एकत्र करा. त्यांना शिकवा·

" समुदाय पाहिजे मोठा । तरी तणावा असावा बळकटा ।
मठ करून ताठा । धरू नये "

रामदासांचे बहुतेक मठ–मुसलमानांची ठाणीं ज्या ठिकाणी होती–त्या ठिकाणी होते. रामदासांची स्वप्ने साकार करणारा एक सत्‌शिष्य त्यांना मिळाला आणि तो म्हणजे शिवाजी. छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थांनी अनेक प्रकारे गुप्तपणे मदत केली. सल्लामसलत दिली. हरिकीर्तनावरोबरच त्यांनी राजकारणाला महत्त्व दिले. समर्थ म्हणतात,

" पहिले ते हरिकीर्तन । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ॥

सावधपणा आणि गुप्तता यांवर समार्थांचा अधिक भर होता. समर्थांचे असे किती तरी गुप्त शिष्य होते. गुप्ततेसंबंधी ते म्हणतात,

" इशारतीचे बोलो नये । बोलायाचे लिहो नये ।
लिहावयाचे सांगो नये । जवाबीने ।।

शिवाजीला सल्लामसलत देऊन हिंदूंचे राज्य स्थापण्यात त्याला समर्थांनी वहुमोल साह्य केले. आग्र्याहून शिवाजी महाराज सुटून आले त्या वेळी त्यांना महाराष्ट्रात सुखरूप परत आणण्याच्या कामात रामदासी मठांनी खूपच साह्य केले. समर्थांच्या एका ओवीवरून त्याची स्पष्ट कल्पना येईल.

" अकरा अकरा बहु अकरा । काय अकरा कळेचिना ।
गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवन भुवनी ॥ "

## स्वप्न साकार झाले

आनंदवनभुवन हे समर्थांनीं महाराष्ट्राला दिलेले लाडके नाव होते. खरोखरच त्यांना महाराष्ट्राचे आनंदवनभुवन करायचे होते. मुसलमानांचा नाश होईल. शिवाजी हिंदूंचा राजा होईल. हिंदू धर्म आणि हिंदू लोक आनंदाने नांदू लागतील. याबद्दल समर्थांनी एक सुंदर स्वप्न रंगविले होते. रामदासी संप्रदायातील लोक त्याला भविष्य पुराण म्हणतात. समर्थांचे स्वप्न असे होते–

"बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ।
मोडली मांडली क्षेत्रे । आनंदवन भुवनी ॥१॥
उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया
जपतप अनुष्ठाने । आनंदवन भुवनी ॥ २ ॥
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान वळावले
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवन भुवनी ॥३॥

## एकचि मागणे आता

समर्थांना ध्यानी मनी देशाची चिन्ता होती. म्हणून त्यांनी लोकांपुढे आदर्श कृष्णाचा न ठेवता मर्यादापुरुषोत्तम रामाचा ठेवला. चाप-बाण धारण करणारा, दुष्टांचा संहार करणारा राम हींच समर्थांची उपास्य देवता होती. इतर देवतांपाशी सुद्धा समर्थ देशाचं कल्याण मागत. एकदा समर्थ नवस फेडण्यासाठी तुळजापूरला गेले होते. त्यांनी भवानीजवळ काय मागितले?

एकची मागणे आता । द्यावे ते मजकारणे
तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हांसि देखता ॥१॥
दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो
परन्तु रोकड काही । मूळ सामर्थ्य दाखवी ॥२॥

## शिवरायाचा आठवावा प्रताप

संपूर्ण राष्ट्राच्या कल्याणाची चिन्ता रामदासांनी केली. म्हणून त्यांना राष्ट्रगुरु म्हणतात. त्यांचं स्वप्न शिवाजी महाराजांनी साकार केलं पण ते पुरं व्हायच्या आधीच शिवाजी महाराजांनी देह सोडला. नंतर संभाजीने गुण उधळले. ते ऐकून समर्थांना वाईट वाटले. त्यांनी संभाजीला उपदेशपर पत्र पाठविले. शिवाजी राजाच्या कर्तृत्वाची आठवण करून दिली.

" शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमण्डळी ।।
त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे विशेष ।

तरी संभाजीमध्ये सुधारणा दिसेना. समर्थांना स्वातंत्र्याची दुर्दशा पाहून वाईट वाटले. लाडका शिवाजी हाही गेला. त्याने मिळविलेल्या राज्याची दैना पाहून समर्थांचे मन निराश झाले. ते उदासीन राहू लागले. त्यानी आपल्या अवतारकार्याची समाप्ती करायचे ठरविले.

## मी आहे जगदाकारे

शेवटी दोन-तीन दिवस समर्थांची प्रकृती बिघडली. तिसऱ्या दिवशी समर्थ पलंगावरून खाली उतरले. पायांत पादुका घातल्या. कर्नाटकाहून आणलेल्या रामाच्या मूर्ती पाहिल्या. समर्थ जाणार म्हणून शिष्यांना वाईट वाटले. उद्धव, कल्याण, वेणूबाई वगैरे शिष्य रडू लागले समर्थ म्हणाले, "रडता कशाला? माझ्या सहवासात राहून हेच शिकलात का ?"

"आपला सहवास अन्तरणार म्हणून वाईट वाटते, आता आम्हाला उपदेश कोण देणार ?" वेणूबाई म्हणाल्या.

" काळजी करू नका, मी गेलो तरी सर्वत्र आहे. मी दासबोधात सर्व सांगितले आहे, तो तुम्हाला मार्गदर्शन करील "

" माझी काया गेली खरे । परी मी आहे जगदाकारे ।
ऐका स्वहित उत्तरे । सांगेन ती ॥
नका करू खटपट । पहा माझा ग्रंथ नीट
तेणे सायुज्याची वाट । नीट पडे ॥

असे सामर्थ्यांनी सांगितले. शके १६०३ मध्ये माघ वद्य नवमीच्या दिवशी-शनिवारी-सज्जनगडावर सामर्थांनी आपला देह ठेवला. राष्ट्रपुरुष शिवछत्रपतींच्या मागे राष्ट्रगुरु समर्थ रामदासही निघून गेले. त्यामुळे महाराष्ट्राचा दुहेरी तोटा झाला. पण अजूनही समर्थांचा उपदेश महाराष्ट्राच्या रोमरोमात भिनला आहे.

* *

# ७. तामीळ भाषेतील श्रेष्ठ सन्त तिरुवल्लुवर



**उर्मट मुलगाही शरमला**

"हीं साडी केवढ्याला हो ? एका मुलाने वल्लुवराला विचारले. मुलगा गुटगुटीत होता. अंगातील पोशाखही चांगला होता. तोंडावर श्रीमंतीचे तेज होते. पण डोळ्यांत उर्मटपणाची आणि पैशाच्या धुंदीची झाक होती. तो बाजाराला आला होता. पण सामान खरेदी करायला नव्हे तर लोकांची चेष्टा करायला आला होता वल्लुवर त्याच गांवातील साळी. पैशाने गरीब पण ज्ञानानें व मानाने श्रीमंत. साड्या विणण्याचा धंदा करून तो आपले पोट भरीत होता. मुलाने किंमत विचारल्यावर वल्लुवराने सांगितले, 'दोन रुपये' मुलाने साडी घेतली. मधोमध टर्रदिशी फाडली.

तिचे दोन सारखे तुकडे केले, आणि वल्लुवराला म्हणाला, 'मला यातील एकच तुकडा घ्यायचा आहे. या एका तुकड्याची किंमत काय ? वल्लुवरानें शांतपणाने सांगितले, 'एक रुपया.' त्या मुलाने पुन्हा मिस्कीलपणे त्या अर्ध्या साडीचे दोन तुकडे केले व त्याला विचारले, 'या तुकड्याची किंमत काय ?' वल्लुवराने तितक्याच शांतपणे व प्रेमळपणाणे सांगितले, 'आठ आणे.' त्या मुलाने साडीचे अनेक तुकडे केले व त्याची सगळी किंमत देऊ लागला. वल्लुवराने ती घेतली नाही. तो म्हणाला ; 'शेतकऱ्याने कापूस पिकवला. माझ्या बायकोने सुताला पाणी घातले आणि मी तीं साडी विणली, अशा रीतीने अनेक लोकांच्या श्रमाने व घामाने ही साडी निर्माण झाली आहे. हिचे मोल चांदीच्या रुपयांनी होणे शक्य नाही. तेव्हा तू मला पैसे देऊ नकोस. पण माझ्याशी ज्या दुष्टपणाने वागलास तसा इतरांशी वागू नकोस सगळ्यांशी प्रेमाने वागत जा.' त्याच्या या प्रेमळ आणि शांतपणाच्या वागणुकीने मुलगा खजील झाला. आजपर्यंत त्याने अनेक लोकांची टर उडविली होती.अनेकांना फजीत केले होते. चेष्टा करतांना तो लहानमोठा काही पहात नसे. मोठमोठे विद्वान् त्याच्याशी बोलायला घाबरत असत. कारण हा त्यांचे बोलणे केव्हा त्याच्या गळ्यात घालील याचा नेम नव्हता पण वल्लुवराप्रमाणे त्याला कोणीच वागविले नव्हते. म्हणून वल्लुरावाचे बोलणे ऐकून तो लाजेने खाली मान घालून घरी निघून आला.

## सोने समुद्रात फेकून दे

दुसऱ्या दिवशी ही हकीकत वडिलांना कळली. आपल्या मुलातील सुधारणा पाहून त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. ते

दुसऱ्या दिवशी वल्लुवराकडे आले आणि म्हणाले, "आपण मुलाला शिकवा, तो दुसऱ्या कोणाकडेही शिकत नाही. आपण त्याला शिकवाल, सुधाराल अशी माझी खात्री आहे. तेव्हा माझ्याकरिता एवढी तसदी घ्या. वल्लुवर म्हणाले, 'ठीक आहे. मला जेवढे येते तेवढे मी जरूर शिकवीन.' दुसऱ्या दिवसापासून तो मुलगा शिकू लागला. वल्लुवरांनी त्याला शिकविले, सुधारले, शहाणे केले. मुख्य म्हणजे त्याला माणूस बनविले. त्या मुलाचा बाप एलेलशिगन्–वल्लुवराकडे आला आणि त्याला पैसे देऊ लागला. कारण तो वल्लुवराचा जन्माचा ऋणी बनला होता. वल्लुवराने पैसे घेतले नाहीत. तो सोने देऊ लागला. पण सोनेही घेतले नाही. एलेलशिगननें विचारले 'मी या सोन्याचे काय करू?' वल्लुवराने सांगितले, 'ते समुद्रात फेकून दे.' त्यांच्या सांगण्याचा अर्थ एवढाच होता की, त्या पैशांचे जहाज खरेदी कर व व्यापार कर. वल्लुवराचे मत असे होते की, श्रीमंतांजवळचा पैसा पडून राहता कामा नये. त्याच्या सर्व धनाचा उपयोग गरीबांसाठी व्हायला पाहिजे. पैशाचा शेवटचा कण असेपर्यंत त्यांनी गरिबांना मदत केली पाहिजे, दान दिले पाहिजे गरिबांच्या उपयोगी पडले पाहिजे. त्यांच्यासाठी चंदनाप्रमाणे झिजले पाहिजे. विद्येचे पैसे नाकारताना सुद्धा त्याने असेच कारण सांगितले की, विद्या हे धन सर्व धनामध्ये श्रेष्ठ आहे. त्याची तुलना सोने, मोती, हिरे, माणके, या कशाशीही करता येणार नाही.

## ग्रंथलेखन

वल्लुवराचे विचार सोपे, सुटसुटीत आणि सामान्य लोकांना कळतील असे असत ... एलेलशिगनला त्याचे विचार फार आवडत. एकदा तो वल्लुवरला म्हणाला. 'महाराज, तुम्हीं माझ्या

मुलाला सुधारलेत पण जगात अशी कित्येक उनाड मुले आहेत वाट चुकलेले लोक आहेत. त्यांना जगांत कसे वागावे हे कळत नाही. ते दुःखात बुडालेले आहेत. त्यांना जीवन सुखाने कसे जगा-हे समजत नाही. म्हणून तुम्ही वेळोवेळी जो उपदेश करता तो लिहून ठेवा. वाट चुकलेल्यांना दीन–दुःखी लोकांना त्याचा उप-योग होईल. निराश लोकांना आशा मिळेल. तेव्हा तुम्ही ग्रंथ लिहा.

एलेलशिंगनाच्या आग्रहास्तव त्यांनी हा ग्रंथ लिहिला. त्यांत सुंदर विचार हळूहळू शब्दांचे रूप घेऊ लागले. ओळीमागून ओळी रचल्या जाऊ लागल्या. ज्ञान आणि कला हातात हात घालून वावरू लागल्या. त्याने हा ग्रंथ 'कुरळ' या छंदांत लिहिला दीड ओळीची एक कविता. दहा कवितांचा एक गुच्छ, अशाप्रकारे एकशे तेहतीस अध्यायांत त्याने ग्रंथाची रचना केली. धर्म, अर्थ आणि काम अशी तीन विभागांत त्याने ग्रंथाची मांडणी केली. त्या त्या विभागांत त्या त्या विषयावरचे आपले मौलिक विचार सांगितले. मोक्षाच्या बाबतीत मात्र त्याने आपले विचार प्रगट केले नाहीत. मोक्षाच्या बाबतीत त्याचे मत असे होते की, 'मनुष्य जर निष्ठेने आणि श्रद्धेने स्वधर्माचे आचरण करील तर त्याला निश्चितच मोक्ष मिळेल. हळूहळू ग्रंथ पूर्ण झाला. पहिल्यांदा ग्रंथ ऐकण्याचा लाभ एलेलशिंगनला मिळाला. त्याने तो ग्रंथ भक्ति-भावाने ऐकला. त्यांतील कांहीं गोष्टी त्याला कळल्या. तो ग्रंथ त्याला फारच आवडला. त्यानें वल्लुवरला आणखी एक विनंती केली. 'महाराज आपण हा ग्रंथ घेऊन मदुरेला चला. तेथील विद्वा-नांना हा ग्रंथ ऐकवा. तिथल्या संघम्ची एकदा मान्यता मिळाली की, प्रत्येक मनुष्य तुमचा ग्रंथ वाचू लागेल. घरोघरी त्याची पारायणे होतील.

दुसऱ्या दिवशी वल्लुवराकडे आले आणि म्हणाले, "आपण मुलाला शिकवा, तो दुसऱ्या कोणाकडेही शिकत नाही. आपण त्याला शिकवाल, सुधाराल अशी माझी खात्री आहे. तेव्हा माझ्याकरिता एवढी तसदी घ्या. वल्लुवर म्हणाले, 'ठीक आहे. मला जेवढे येते तेवढे मी जरूर शिकवीन.' दुसऱ्या दिवसापासून तो मुलगा शिकू लागला. वल्लुवरांनी त्याला शिकविले, सुधारले, शहाणे केले, मुख्य म्हणजे त्याला माणूस बनविले. त्या मुलाचा बाप एलेलशिगन्–वल्लुवराकडे आला आणि त्याला पैसे देऊ लागला. कारण तो वल्लुवराचा जन्माचा ऋणी बनला होता. वल्लुवराने पैसे घेतले नाहीत. तो सोने देऊ लागला. पण सोनेही घेतले नाही. एलेलशिगननें विचारले 'मी या सोन्याचे काय करू ?' वल्लुवराने सांगितले, 'ते समुद्रात फेकून दे.' त्यांच्या सांगण्याचा अर्थ एवढाच होता की, त्या पैशांचे जहाज खरेदी कर व व्यापार कर. वल्लुवराचे मत असे होते की, श्रीमंतांजवळचा पैसा पडून राहता कामा नये. त्याच्या सर्व धनाचा उपयोग गरीबांसाठी व्हायला पाहिजे. पैशाचा शेवटचा कण असेपर्यंत त्यांनी गरिबाना मदत केली पाहिजे, दान दिले पाहिजे गरिबांच्या उपयोगी पडले पाहिजे. त्यांच्यासाठी चंदनाप्रमाणे झिजले पाहिजे. विद्येचे पैसे नाकारताना सुद्धा त्याने असेच कारण सांगितले की, विद्या हे धन सर्व धनामध्ये श्रेष्ठ आहे. त्याची तुलना सोने, मोती, हिरे, माणके, या कशाशीही करता येणार नाही.

### ग्रंथलेखन

वल्लुवराचे विचार सोपे, सुटसुटीत आणि सामान्य लोकांना कळतील असे असत . . . एलेलशिगनला त्याचे विचार फार आवडत. एकदा तो वल्लुवरला म्हणाला, 'महाराज, तुम्ही माझ्या

मुलाला सुधारलेत पण जगात अशी कित्येक उनाड मुले आहेत वाट चुकलेले लोक आहेत. त्यांना जगांत कसे वागावे हे कळत नाही. ते दुःखात बुडालेले आहेत. त्यांना जीवन सुखाने कसे जगा-हे समजत नाही. म्हणून तुम्ही वेळोवेळी जो उपदेश करता तो लिहून ठेवा. वाट चुकलेल्यांना दीन–दुःखी लोकांना त्याचा उपयोग होईल. निराश लोकांना आशा मिळेल. तेव्हा तुम्ही ग्रंथ लिहा.

एलेलशिंगनाच्या आग्रहास्तव त्यांनी हा ग्रंथ लिहिला. त्यांत सुंदर विचार हळूहळू शब्दांचे रूप घेऊ लागले. ओळीमागून ओळी रचल्या जाऊ लागल्या. ज्ञान आणि कला हातात हात घालून वावरू लागल्या. त्याने हा ग्रंथ 'कुरळ' या छंदांत लिहिला दीड ओळीची एक कविता. दहा कवितांचा एक गुच्छ, अशाप्रकारे एकशे तेहतीस अध्यायांत त्याने ग्रंथाची रचना केली. धर्म, अर्थ आणि काम अशी तीन विभागांत त्याने ग्रंथाची मांडणी केली. त्या त्या विभागांत त्या त्या विषयावरचे आपले मौलिक विचार सांगितले. मोक्षाच्या बाबतीत मात्र त्याने आपले विचार प्रगट केले नाहीत. मोक्षाच्या बाबतीत त्याचे मत असे होते की, 'मनुष्य जर निष्ठेने आणि श्रद्धेने स्वधर्माचे आचरण करील तर त्याला निश्चितच मोक्ष मिळेल. हळूहळू ग्रंथ पूर्ण झाला. पहिल्यांदा ग्रंथ ऐकण्याचा लाभ एलेलशिंगनला मिळाला. त्याने तो ग्रंथ भक्तिभावाने ऐकला. त्यांतील कांही गोष्टी त्याला कळल्या. तो ग्रंथ त्याला फारच आवडला. त्यानें वल्लुवरला आणखी एक विनंती केली. 'महाराज आपण हा ग्रंथ घेऊन मदुरेला चला. तेथील विद्वानांना हा ग्रंथ ऐकवा. तिथल्या संघम्ची एकदा मान्यता मिळाली की, प्रत्येक मनुष्य तुमचा ग्रंथ वाचू लागेल. घरोघरी त्याची पारायणे होतील.

## तामीळ भाषेतील वेद–विद्वानांची मान्यता

वल्लुवराला मदुरेला जायची इच्छा नव्हती. पण एलेलशिंगनच्या आग्रहास्तव आपल्या कवितांचे बाड घेऊन तो मदुरेला आला. तेथील विद्वानांना त्याने आपला ग्रंथ ऐकण्याची विनंती केली. पण पहिल्यांदा विद्वानांनी त्याची टिंगल केली की, हा फाटक्या अंगाचा दरिद्री माणूस काय कविता रचणार ? पण वल्लुवराने जेव्हा पुन: पुन: आर्जवून विनंती केली तेव्हा विद्वान लोकांनी त्याचा ग्रंथ ऐकण्याचे कबूल केले. विद्वान लोकांनी त्याचा ग्रंथ ऐकला. ३९ विद्वानांनी त्याची परीक्षा केली आणि एकमुखाने त्या ग्रंथाला मान्यता दिली. त्या ग्रंथाची स्तुति केली. ते विद्वन् म्हणाले, "असा अलौकिक ग्रंथ आजपर्यंत तेलगू भाषेत लिहिला गेला नाही. यात जीवनांचे तत्त्वज्ञान फार सुंदर रीतीने मांडले आहे. जीवनाची लांबी, रुंदी, खोली सर्व काही यात आहे. यातील विद्वत्तेपुढे आमचीसुद्धा विद्वत्ता फिकी पडेल. वल्लुवराचा 'कुरळ' म्हणजे तामीळ भाषेतील वेद आहे. विद्वनांनी 'कुरळ'च्या मागे 'तिरु' ही आदरदर्शक उपाधी लावली. जाताना नुसता 'कुरळ' नावाचा ग्रंथ होता. येताना तो 'तिरुकुरळ्' झाला. विद्वानांनी वल्लुवराचा सुद्धा गौरव केला. वल्लुवराचा 'तिरुवल्लुवर' म्हणजे श्रीवल्लुवर झाला. मानसन्मानाने तो गांवी आला. लोक घरोघर त्याच्या ग्रंथाची पारायणे करू लागले. तो ग्रंथ म्हणजे लोकांच्या जीवनाचा वाटाड्या ठरला.

तिरुवल्लुवराच्या ग्रंथाचे सौंदर्य आणि ताजेपणा आजही अबाधित आहे. आजही त्याच्या ग्रंथापासून लोकांना मार्गदर्शन मिळत आहे.

## उपदेश

असा हा सुंदर ग्रंथ आहे तरी कसा? त्या ग्रंथातील कांही उद्धरणांवरूनच पाहू. तिरुवल्लुवर म्हणतो–

"अन् बुम् अर् नुम् उडैत्तायिन्
इलवाळक्कै पणबुम् पयनु मदु"

याचा अर्थ असा की, प्रेम आणि धर्म यांनी युक्त असलेले गृहस्थ-जीवनच श्रेष्ठ आणि सफल समजावे

"पयन् रुक्कर शॅयद उदवि नयन् रुविकन्
नन् मै कडलिर् पॅरिदु"

परतफेडीची अपेक्षा न धरता केलेला उपकार हा सागराहूनही मोठा आहे

त्याच्या ज्ञानाने भारवलेले जैन, बौद्ध, वैष्णव लोक त्याला आपापल्या पंथात ओढतात. कांही विद्वान् त्याला शूद्र जातीचा समजतात. कांही विद्वानांचे मत असे आहे की, राजकारणातील एवढे सखोल ज्ञान सांगणारा हा कुठल्यातरी राजाच्या पदरी प्रधान म्हणून असावा. ते तिरुवल्लुवर या शब्दाची व्युत्पत्ती "श्रीवल्लभ" या शब्दावरून काढतात. आणि 'श्रीवल्लभ' हा राजाने दिलेला किताब मानतात. याबाबत विद्वानांची मते कांहीही असली तरी तिरुवल्लुवर हा तामील भाषेतील उत्तम ग्रंथकार, ज्ञानी, स्थितप्रज्ञ आणि लोकांना मार्ग दाखविणारा श्रेष्ठ सन्त होता. हे मात्र निश्चित.

# ८. कर्नाटकातील तुकाराम-संत पुरंदरदास



“ गरीब ब्राह्मण आहे. मला काही तरी मदत करा हो! ” म्हणून दुकानाच्या दारांत एक जख्ख म्हातारा उभा. श्रीनिवास नाईक आत बसले होते. हिरे माणकांचा त्यांचा व्यापार होता. गोड बोलून आपला माल खपविण्यात नाईक हुशार होते. श्रीनिवास नाईकाच्या दुकानात बडीबडी गिऱ्हाईके बसली होती आणि दारात याचक उभा होता. नाईकांना देण्याची इच्छा नव्हती, पण नाही कसे म्हणायचे? कारण चार बडे लोक दुकानात बसले होते. त्याने ब्राह्मणाला सांगितले, “ आता मला वेळ नाही. उद्या ये. ”

## नवसाने झालेला मुलगा

नाईकांजवळ द्यायला पैसे नव्हते असे नाही तर अंगात दानत नव्हती. पैशाचा लोभ फार वाईट. एकदा तो मिळायला लागला

की आणखी मिळावासा वाटतो. नाईकाच्या बाबतीत तसेच झाले होते. पुरंदरगडाच्या वरदप्प नाईक नावाच्या धार्मिक आणि सत्वशील ब्राह्मणाचा हा मुलगा. आईचे नाव लक्ष्मी अक्का. दोघांना बरेच दिवस मुलगा नव्हता. मुलगा व्हावा म्हणून त्यांनी श्री वेंकटपतीची– श्रीनिवासाची उपासना करायला सुरुवात केली. जवळ जवळ बारा वर्षे उपासना झाल्यानंतर श्रीवेंकटेशाने त्यांना मुलगा होईल म्हणून आशीर्वाद दिला. आशीर्वादाप्रमाणे नाईकांना मुलगा झाला. श्रीनिवासाच्या आशीर्वादाने आपल्याला मुलगा झाला म्हणून मुलाचे नाव श्रीनिवास ठेवले. श्रीनिवास मोठा होऊ लागला. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे त्याचे सर्व शिक्षण झाले. संगीत कलेत त्याने विशेष प्रावीण्य मिळविले. वडिलांनीं त्याचे लग्न करून दिले. बायकोही सुंदर, सुस्वभावी आणि सात्त्विक मिळाली. श्रीनिवासजवळ सगळी सुखं होती भरपूर पैसा होता. प्रेमळ आई-वडील होते.

**कंजुष नवकोट नारायण**

काही दिवसानंतर वडील मरण पावले. वडिलांच्या संपत्तीचा श्रीनिवास मालक झाला. वडिलांचा सराफीचा धंदा त्याने पुढे चालविला. तो हिरे--माणकांचा व्यापार करू लागला. आपल्या गोड वाणीनें त्याने राजेरजवाडे–सावकार अशी श्रीमंत गिऱ्हाइकं मिळविली. त्याचा धंदा जोरात चालू लागला. लाखो रुपयांचा फायदा त्याला मिळू लागला. थोड्याच काळात नवकोट नारायणांत त्याची गणना होऊ लागली पैसा मिळत गेला पण खर्च करण्याची किंवा दान देण्याची त्याची बुद्धी नव्हती. खूप पैसा मिळवावा व साठवून ठेवावा याकडेच त्याची प्रवृत्ती होती. म्हणूनच त्याने दुकानावर आलेल्या ब्राह्मण याचकाला 'उद्या ये'

म्हणून परत पाठविले. त्याला वाटले. उद्या कुठला हा ब्राह्मण येतोय. पण ब्राह्मण कसला वस्ताद. तो दुसऱ्या दिवशी श्रीनिवासच्या दुकानात दत्त म्हणून येऊन उभा राहिला. श्रीनिवास नाईकांनी त्याला टाळण्यासाठी 'उद्या ये' म्हणून सांगितले. बऱ्याच वेळा आल्यानंतर श्रीनिवास नाईकांनी त्याला एक खोटा पैसा दिला. ब्राह्मण निराश झाला. इतक्या दिवसाच्या कष्टाचे फळ काय ? तर एका खोटचा पैशाची प्राप्ती. ब्राह्मणाने तो पैसा घेतला नाही. तो तसाच निघून गेला. श्रीनिवास नाईकांच्या कंजूष मनाला वाटले की बरे झाले, ब्याद टळली.

**याचकाला नथ दिली**

ब्राह्मण श्रीनिवास नाईकांच्या घरचा पत्ता हुडकीत त्यांच्या घरी गेला. घरात त्याची बायको होती. ब्राह्मणाने तिला आपली कर्मकहाणी सांगितली. माझ्या मुलाची मुंज करायची आहे, आपण मदत करावी, तर माझा मुलगा ब्राह्मण होईल. नाईकांच्या बायकोच्या हातात तरी काय होते ? ती आणि तो याचक दोघे सारखेच, पण फरक एवढाच की ती एका भव्य वाड्यात रहात होती. पण ब्राह्मणाची ही हकीकत ऐकून ती कळवळली. तिचे औदार्य जागं झालं. झटकन् तिनं आपल्या नाकातील हजार रुपये किमतीची नथ मागचा पुढचा विचार न करता ब्राह्मणाच्या ओंजळीत टाकली. ब्राह्मण ती नथ घेऊन नाईकांच्या दुकानात आला. त्यांना नथ दाखवूत म्हणाला, " ही नथ घ्या आणि या नथेवर मला पैसे द्या. नाईकांनी ती नथ पाहिली. त्यांना संशय आला. नथ ओळखीची वाटत होती. पण ब्राह्मणासमोर बोलणार कसे ? त्यांनी ब्राह्मणाला सांगितले की, या नथेची मला परीक्षा करायला पाहिजे; तू उद्या ये आणि पैसे घेऊन जा ब्राह्मण

निघून गेला. नाईक धावतच घरी आले. बायकोच्या नाकाकडे पाहिले तो नाकात नथ नाही. त्यांनी दरडावून विचारले, 'नथ कोठे आहे ? ताबडतोब मला नथ आणून दे.' बायको म्हणाली, 'एवढं रागवायला काय झालं ? अंघोळ करताना नथ बाजूला काढून ठेवली जरा थांबा आतून तुम्हाला नथ आणून देते.' बायको आत गेली. नथ दिल्यावर काय प्रसंग येईल याची तिला कल्पना होती. मार आणि शिव्या खाण्यापेक्षा मरण बरे म्हणून तिने बोटातल्या अंगठीतील हिरकणी काढली. ती वाटली आणि एका पेल्यात पाणी घऊन त्यात मिसळली. देवापुढे जाऊन देवाची प्रार्थना केली आणि ते पाणी पिणार इतक्यात डुबुक असा आवाज झाला. तिने डोळे उघडले. पहाते तो पेल्यात याचकाला दिलेली नथ होती, तिला अतिशय आनंद झाला. धावतच येऊन नवऱ्याला तिने ती नथ दिली. क्षणभर नाईकांचा आपल्या डोळयावर विश्वासच बसेना. ही दुसरी नथ कोठून आली ? ते ताबडतोब नथ घेऊन दुकानात गेले. तिजोरीत ज्या ठिकाणी नथ ठेवली होती ती जागा पाहिली त्या ठिकाणी नथ नव्हती. श्रीनिवास नाईकांना आता खात्री पटली की तो याचक दुसरा तिसरा कोणी नसून साक्षात परमेश्वर होता. त्यांना पश्चात्ताप होऊ लागला. आपल्या दारात परमेश्वर याचक म्हणून आला होता आणि आपण त्याला विन्मुख पाठविले याचे त्याना वाईट वाटू लागले.

## जीवनात परिवर्तन

श्रीनिवास नाईकांचे डोळे उघडले. पैशाची धुंदी खाडकन् उतरली. पैशाच्या धुंदीत आपण परमेश्वराला विसरलो म्हणून त्यांनी पैशाचा त्याग करायचे ठरविले. सर्वस्वाचं दान करून ते

पंढरपूरला आले. 'देवा माझ्या बायकोवर कृपा केलीस तशी माझ्यावर कर' म्हणून त्यांनी ठाण मांडले. तीन दिवस अन्नपाणी घेतले नाही. तिसऱ्या दिवशी स्वप्न पडले की, तुझ्यावर कृपा करायला अजून अवकाश आहे. तोपर्यंत तू उपासना कर.

**ग्रंथरचना**

देवाच्या आदेशाप्रमाणे श्रीनिवास नाईक पंढरपुरातच राहू लागले. दिवसभर परमेश्वराची भक्ती करीत. बारा वर्षानंतर त्यांनी श्रीव्यासरायांचे शिष्यत्व पत्करले. व्यासरायांनीं त्यांच्यावर अनुग्रह केला. त्यांना ज्ञान दिले आणि सांगितले की, तू आपल्या ज्ञानाचा उपयोग जनता-जनार्दनाच्या कल्याणासाठी कर. ते विठ्ठलाची भक्ती करीत. कीर्तन करीत आणि कीर्तनातून लोकांना उपदेश करीत. त्यांनी चार लाख पंच्याहत्तर हजार पद्यरचना केल्याचा उल्लेख आहे. द्रौपदीवस्त्रहरण, सुदाम चरित्र, परतत्त्वसार वगैरे त्यांचे स्वतंत्र ग्रंथही आहेत पण ते अजून अप्रकाशित आहेत. व्यासरायांनी त्यांचे नाव पुरंदर विठ्ठल असे ठेवले होते. लोक त्यांना पुरंदरदास म्हणत.

**देवाला यथेच्छ बडविले**

पुरंदरदासांना नारदाचा अवतार समजत. विठ्ठलाच्या कीर्तनात ते इतके रंगून जात की, त्यांना देहाचे भान रहात नसे. त्यांच्या भक्तीने देवही त्यांना वश झाला होता. त्याच्या वृद्धापकाळची एक गोष्ट सांगतात. म्हातारपणी त्यांना कमी दिसू लागले. एकदा रात्री ते पाणी पिण्यासाठी उठले. आपल्या मुलाला पाणी आणण्यास सांगितले. पण मुले गाढ झोपली होती. कोणीहि जागे झाले नाही.

शेवटी आपल्या भक्ताला पाणी देण्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंग

त्यांच्या मुलाच्या रूपाने आले. पण पुरंदरदासांना याची काहीच कल्पना नव्हती. मुलाला पाणी आणण्यास उशीर झाला म्हणून त्याला दासांनी यथेच्छ झोडपले. दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांना खरी गोष्ट कळली तेंव्हा आपण देवाला मारले म्हणून त्यांना अतिशय वाईट वाटले. त्यांनी देवाची क्षमा मागितली.

**गरुड खांब**

नंतर थोड्याच दिवसांनी एक घटना घडली. देवदासांच्या रूपाने एका वेश्येकडे गेले. आपल्या हातातील रत्नकंकण तिला काढून दिले आणि तिला सांगितले की, मी रात्री येतो दुसऱ्या दिवशी पुजाऱ्यांनी पाहिले की देवाच्या हातात रत्नकंकण नाही. शोधाशोध सुरू झाली, इतक्यात वेश्या दर्शनाला आली. तिच्या हातात रत्नकंकण दिसले. पुजाऱ्यांनी तिला पकडले. तिने सांगितले " यात माझा काहीच दोष नाही, मला हे कंकण पुरंदरदासांनी दिले आहे. " इतक्यात आपली मानसपूजा आटोपून पुरंदरदासही दर्शनास आले. पुजाऱ्यांनी दासांना पकडले, खांबास बांधले आणि यथेच्छ मार देण्यास सुरुवात केली. दासांना खरी घटना कळून आली. ते देवाला म्हणाले, ' देवा मी तुला मारले त्याचा वचपा काढलास होय ? अरे तू दीनदयाळू, कृपाघन, भक्तवत्सल म्हणवतोस आणि भक्तांनाच मारतोस ? माझ्याकडून चुकून अपराध घडला. मला तू क्षमा कर.' दासांनी खूप आळवणी केली. इतक्यात चमत्कार घडला देवाच्या हातातील दुसरे रत्नकंकण दासांच्या पायाशी येऊन पडले. हा चमत्कार पाहून लोकांना खात्री पटली की, दास निर्दोषी आहेत. त्यांनी दासांना सोडून दिले. ज्या खांबाला दासांना बांधले होते. तो खांब आजहि दाखविण्यात येतो त्या खांबास ' गरुड खांब ' म्हणतात.

## भक्तिरसपूर्ण रचना

पुरंदरदास हे पांडुरंगाचे एकनिष्ठ भक्त होतें. आपल्या भक्तीने आणि प्रभावी वाणीने त्यांनी विठ्ठलभक्तीचा प्रचार केला. त्यांनी खूप पदे रचली. त्या पदामध्ये आपली दीनता, नम्रता, नामस्मरणाचा महिमा वगैरे गोष्टींचे वर्णन आहे. ती पदे रसाळ, मधुर व प्रासादिक आहेत. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे तुकोबा त्याप्रमाणे कर्नाटकात पुरंदरदास. आजही कर्नाटकातील लोक त्यांची पदे व भजने आवडीने गातात. त्यांचे एक मधुर कानडी पद पहा

" सुलभ पूजि केलि सूक्ष्म जनख "

याचा मराठीत अनुवादही किती सुंदर झाला आहे पहा–

‘ सुलभ करा हे श्री हरि पूजन
ज्यात न वेचे किमपि हो धन ।। धृ ।।
समजा गृहदीपा नीरांजन
नवपट धरिता ते कृष्णार्पण
षड्रस अन्ने करिता सेवन
गोविंदाचे करणे चिंतन ।। १ ।।
बोल सकल स्तुति गोपालाची
स्त्री-सुत मंडळी सर्व ही त्याची
पथ क्रमताना प्रदक्षिणाची
शयनि निजणे जाणा वंदन ।। २ ।।

या पदात दासांनी पूजेची सुलभ पद्धती सांगितली आहे.

अशा रीतीने अनेक पदे रचून लोकांना भक्तीचा मार्ग दाखवणारा हा महान कानडी संत इ. स. १५६४ पौष वद्य अमावास्या या दिवशी सकाळी आनेगुंदी येथे मरण पावला. त्याची ज्योत विठ्ठल स्वरूपात विलीन झाली.

# १. वीरशैव संप्रदायाचा प्रसारक बसवेश्वर



## मी मुंज करणार नाही

"बाबा, कशाला उगीच खटपट करता ? तुमचे सगळे परिश्रम व्यर्थ जातील. मी मुंज करणार नाही. माझा त्याच्यावर विश्वास नाही." एका आठ वर्षाच्या मुलाने वडिलांना सांगितले. "बाळ, असं म्हणू नये.–मुंजीने बुद्धीवर संस्कार होतात; आत्मशुद्धी होते. माहिराजाकडे आलेल्या एका विद्वान् ब्राह्मणाने सांगितले.

"पण आत्मा हा अशुद्ध आहे का? तर त्याची शुद्धी करावयची. आत्मा हा तर नेहमीच शुद्ध असतो. तेव्हा आत्माशुद्धीची गरजच

नाही. वरं देहशुद्धी म्हणाल तर तीही करणं अशक्य आहे. कारण देहात इतके असंख्य दोष आहेत की ते एका संस्काराने मुळीच घालविता येणं शक्य नाही. संस्कार हे कर्मरूप आहेत. कर्माने कशाचीही शुद्धी व्हायची नाही. तेव्हा मला मुंज करायची नाही. तुम्ही या मुंजीच्या भानगडीत पडू नका"– त्या आठ वर्षांच्या मुलाच्या सडेतोड उत्तराने सगळे विद्वान ब्राम्हण निरुत्तर झाले. कोणालाच मुंजीचे महत्त्व पटवून सांगता येईना. हा आठ वर्षांचा चुणचुणीत आणि हुशार मुलगा म्हणजेच बसवेश्वर होय.

## शिवभक्ताच्या घरात जन्म

विजापूर येथील इंगळेश्वर वागेवाडी या गावात माहिराज आणि माहाम्बा दोघे पति-पत्नी राहात होते. संसार सुखाचा चालला होता. दोघेही धार्मिक आणि सत्त्वशील स्वभावाची होती. शिवाची आणि नंदीची एकनिष्ठ भक्त. रोज शिवाची उपासना करीत. शंकराची पूजा झाल्याशिवाय तोंडात पाणी घेत नसत. संसारात कुठलीच उणीव नव्हती. हो, एक उणीव मात्र होती. घरात अद्यापि पाळणा हलला नव्हता. दोघांनाही पुत्रमुख पाहाव-याची अनावर इच्छा होती, आणि रोज शिवाजवळ हेच मागणे ती मागत असत. उतारास लागलेले वय आणि घरात मुलगा नाही. यामुळं माहाम्बेचं मन फारच उदास होऊं लागलं. ती आपला सगळा वेळ शिवाच्या आराधनेंत घालवी. एके दिवशी शंकरांनी दृष्टान्त दिला. स्वप्नात येऊन सांगितलं, "माहाम्बे, काळजी करू नकोस. तुझ्या पोटी एक थोर शिवभक्त जन्माला येईल आणि तो शिवभक्तीचा प्रसार करील. माहाम्बा जागी झाली. तिनं आपलं स्वप्न पतीला सांगितलं. दोघांनाही आनंदा–

मुळं अस्मान ठेगणं वाटू लागलं. वृषभेश्वराच्या प्रसादाने मुलगा झाला म्हणून मुलाचं नाव बसवेश्वर ठेवण्यात आले.

## शिवभक्तीचे संस्कार

बसवेश्वराचे बालपण माता-पित्याच्या छत्रछायेखाली सुखा-समाधानात गेले. आई-वडील शिवभक्त असल्यामुळे आपोआपच लहानपणी बसवेश्वरांवर शिवभक्तीचे संस्कार झाले. लहानपणा–पासून शंकराकडे त्याचे मन ओढ घेऊ लागले. जवळच 'संगमे–श्वरा'चे स्थान होते. संगमेश्वर म्हणजे बसवेश्वरांच्या विसाव्याचे स्थान. तेथे जाऊन ते तासन् तास चिन्तन करीत बसत. मनात विचाराचं वादळ सुरू झालं की, छोटा बसव संगमेश्वराच्या देवळात जाऊन बसे. तेथे त्याच्या शंकांची उत्तरे मिळत आणि विचारांचे वादळ आपोआप शांत होई. संगमेश्वरावर त्याची नितान्त श्रद्धा होती. बसवेश्वर फारच बुद्धीमान होते. लहानपणीच वेद, उपनिषदे वगैरे ग्रंथांचे त्याने अध्ययन केले होते. आठव्या वर्षी मुंजीचा प्रश्न जेव्हा निघाला त्या वेळी आपल्या विद्वत्तेने त्याने विद्वान् ब्राह्मणांना चकित केले. त्या वेळच्या लोकांचा कर्मकांडांवर फार विश्वास होता. कर्माच्या जाळ्यात लोक अडकत. बसवेश्वरांना या गोष्टीचाच विरोध करायचा होता. कर्मकाण्डापेक्षा शिवभक्तीने मोक्ष मिळतो. भक्तीमार्ग साधा, सोपा व सुकर आहे हे त्यांना लोकांना दाखवायचे होते. म्हणून त्यांनी मुंज केली नाही. लहानपणी त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक आणखी एका प्रसंगी दिसून आली.

## मी वाचतो ताम्रपट

राजसभा भरली होती. कल्याणचा राजा विज्जल याला एका माणसानें एक ताम्रपट आणून दिला होता. पण राजाला तो

ताम्रपट वाचता येईना म्हणून पंडितांना बोलाविले.सगळचांनी प्रयत्न केला पण कोणालाच वाचता येईना. शेवटी सगळे हताश होऊन बसले. राजाही चिन्तामग्न होऊन बसला. इतक्यात सभेतून एक तरुण पुढे आला आणि राजाला म्हणाला, ' महाराज, मी वाचतो ताम्रपट." राजाला आनंद झाला. त्याने परवानगी दिली त्या सोळा–सतरा वर्षाच्या तरुणाने तो ताम्रपट वाचून त्याचा अर्थ सांगितला. "राजाच्या सिंहासनाखाली खूप द्रव्य आहे" असा त्याचा अर्थ होता. त्याच्या खरेपणाची प्रचीती पाहण्यासाठी राजाने सिंहासनाखाली उकरले तो खरोखर भरपूर धन त्याला मिळाले. राजा त्या तरुणाच्या बुद्धीमत्तेवर खूष झाला. तो तरुण म्हणजेच बसवेश्वर होय. राजाने बसवेश्वराचा खूप गौरव केला व त्याला आपल्या दरबारात मानाची जागा दिली. बलदेव म्हणून राजाचा मुख्य दिवाण होता. त्या बलदेवाचा बसवेश्वर हा भाचा. आपल्या मामाबरोबर कधीमधी बसवेश्वर दरबारात जात असे. राजाने केलेल्या गौरवामुळे मामाला–बलदेवालाहि खूप आनंद झाला.

## वीरशैव संप्रदायाचा प्रसार

बसवेश्वर मोठा होत होता. वयाबरोबरच त्याच्या बुद्धीचाही विकास होत होता. शंकराची भक्ती चाललीच होती. कर्नाटकात शिवभक्त रामय्या याने आपल्या ५०० साधूंबरोबर शिवभक्तीचा प्रचार आणि पुनरुज्जीवन करायला सुरुवात केली. त्याच्यापासून बसवेश्वरालाही स्फूर्ती मिळाली आणि त्याने शिवभक्तीचा प्रसार करायला सुरूवात केली.त्यावेळी त्याची कर्तबगारी आणि कार्यकुशलता दिसून आली. गावांतील लोकांची संघटना करून गावात एक शंकराचे देऊळ बांधले व लोकांना शिभक्तीचा सोपा मार्ग

दाखविला. त्यावेळी कर्नाटकात जैन धर्मीयांचे प्राबल्य होते. प्रत्यक्ष राजा विज्जल हा जैन धर्माचा होता. सर्वांचा विरोध सहन करून बसवेश्वरांनी वीरशैव संप्रदायाचा प्रसार केला. कन्नड व आंध्र या दोन्ही साहित्यात बसवेश्वरांना मोठे मानाचे स्थान आहे. कन्नड भाषिक त्यांना ' बसवण्णा ' म्हणतात.

## भाचा जांवई झाला

बसवेश्वर प्रचार करीत होते, त्यांच्या कर्तबगारीची आणि बुद्धीची चमक लोकांना दिसून आली. शांत व प्रेमळपणाने धर्माचा प्रसार करणारा म्हणून त्यांच्यावर लोकांची श्रद्धा होती. त्यांना अनेक अनुयायी मिळाले. असा कर्तबगार आणि गुणी जांवई आपल्याला मिळावा अशी बलदेवाची फार इच्छा होती. त्याने महिराजाशी बोलणी केली. महिराजही या संबंधास तयार होते. बलदेवाने आपली मुलगी गंगाम्बा हिचा विवाह बसवेश्वराशी करून दिला. एका सुमुहूर्तावर बसवेश्वर बलदेवाचे जांवई झाले.

## बसवेश्वर प्रधान झाला

बलदेव म्हातारा झाला होता. तशात त्याला एका दुर्धर व्याधीने पछाडले यातून आपण जिवंत राहात नाही अशी त्याची खात्री झाली. आपल्यानंतर दिवाणपद आपल्या कर्तबगार जावयाला, बसवेश्वराला मिळावे अशी त्याची इच्छा होती. त्याने विज्जलाला तशी सूचना केली.बसेश्वराची बुद्धिमत्ता आणि कर्तबगारी राजाला माहीत होती. बसवेश्वर आपला प्रधान होण्यास योग्य आहे असे राजाला वाटले. त्याने त्या सूचनेला एकदम मान्यता दिली आणि बलदेवानंतर बसवेश्वर विज्जलाचा प्रधान झाला. पण प्रधानपद स्वीकारण्यापूर्वी त्याने राजाला बजावले, " तू जैन धर्मीय आहेस.

मी शिवभक्त आहे. शिवभक्तांना मी एखादी सवलत दिली, तर तू बोलता कामा नयेस. लोक तुझे कान फुंकतील, तू तिकडे लक्ष देऊ नयेस." विज्जलाने ही अट मान्य केली. बसवेश्वर प्रधान झाला.

## दोन धर्मपंथात युद्ध

पहिल्यांदा बसवेश्वर आणि विज्जल यांचे संबंध चांगले होते. बसवेश्वराच्या ताब्यात तिजोरी आणि अधिकार दोन्हीही होते. वेळोवेळी शिवभक्तांना सवलती मिळत. शिवाच्या उत्सवाला पैशाची मदत मिळे, शिवभक्तीच्या प्रसाराचे काम आता बसवेश्वर पहात नसत. बसवेश्वराचा भाचा चन्नबसव हा प्रसाराचे काम पाही. बसवेश्वर नुसते मार्गदर्शन करीत. बसवेश्वर शिवभक्तांना मदत करतो हे जैनांना आणि वैष्णवांना पाहवले नाही. त्यांनी राजाचे कान भरण्यास सुरुवात केली. प्रथम प्रथम राजाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. पण जेव्हा सारख्या तक्रारी येऊ लागल्या तेव्हा राजाने त्यास पकडण्याचा हुकूम सोडला. सैनिक बसवेश्वरास पकडण्यास आले ही गोष्ट शिवभक्तांना कळली. ताबडतोब सगळे शिवभक्त बसवेश्वराजवळ जमले. त्यांच्या मदतीने बसवेश्वर निसटून गेले. पण शिवभक्त आणि विज्जलाचे सैनिक यांच्यात तुंबळ युद्ध झाले. दोन धर्मपंथात युद्ध झाले. त्यात बरेचसे लोक मारले गेले. विज्जलाचा पराभव झाला. शिवभक्तांनी विज्जलाला नमते घ्यायला लावले व पुन्हां बसवेश्वरांना प्रधानपद देण्यास भाग पाडले. बसवेश्वर पुनः प्रधान झाले.

## प्रधानकीचा त्याग

पण आता त्यांच्यात पूर्वीचा सलोखा राहिला नव्हता, बेबनाव उत्पन्न झाला होता. दोघेही एकमेकांस पाण्यात पहात असत राजा

बसवेश्वराच्या प्रत्येक गोष्टीकडे कलुषित नजरेने पाही. बसवेश्वराच्या सुधारणा जैन लोकांना मानवण्यासारख्या नव्हत्या. बाल-विवाह न करणे, विधवा-विवाहाला आणि मिश्रविवाहाला मान्यता हे जैन धर्मीयांना आवडणारे नव्हते. एका मिश्रविवाहित जोडप्यास राजाने कडक शिक्षा केली. शिवभक्तांना हे आवडले नाही. खुद्द बसवेश्वरालाही हे आवडले नाही. सगळा शिवभक्तांचा समाज खवळला. त्या धार्मिक पंथास शस्त्रधारी समुदायाचे स्वरूप आले आणि यांना वेळीच आवरले नाही तर याचे रूपान्तर भयंकर यादवीत होणार, अतोनात मनुष्यहानी होणार हे बसवेश्वरांना स्पष्ट दिसत होते. त्यांनी दोन्ही पक्षांना समजाविण्याचा प्रयत्न केला, पण जैन धर्मीय राजा विज्जल त्याचे ऐकेनात आणि शिवभक्तांचा समदाय खवळलेला. त्यात चन्नवसवासारखे तडफदार आणि सळसळत्या रक्ताचे पुढारी त्यांना मिळालेले, तेही ऐकायला तयार नव्हते. आपले लोक सुद्धा आवरणे कठीण होते. यादवीतील भांडणे आवरता आली नाहीत. त्यावेळी श्रीकृष्ण जसे एका झाडाखाली निराश मनाने येऊन बसले, त्याप्रमाणेच आपल्या पक्षाला आपल्याला आवरता येत नाही व आपल्या डोळ्यादेखत युद्ध आणि मनुष्यहानी नको म्हणून बसवेश्वरांनी प्रधानपदाचा त्याग केला. ते आपल्या आवडत्या विसाव्याच्या जागी संगमेश्वरी येऊन राहिले.

## अन्त

पण बसवेश्वराच्या प्रधानपदाच्या त्यागाला विज्जल कारणीभूत आहे म्हणून ठिणगी पेटली. युद्धाचा भडका उडाला. अतोनात मनुष्यहानी झाली. त्या दंगलीत विज्जल मारला गेला. विज्जलाला मारण्याचे बसवेश्वराचे कारस्थान असले पाहिजे असे वाटून

जैन धर्मीय सैनिक बसवेश्वरांना मारण्यासाठी संगमेश्वराकडे धावले. बसवेश्वरांनी हे ओळखले. शत्रूच्या तलवारीने मरण नको म्हणून असे सांगतात की बसवेश्वरांनी विहिरीत उडी टाकून आत्महत्त्या केली. काही शिवभक्त असेही म्हणतात की सैनिक आलेले पाहून बसवेश्वर संगमेश्वराच्या स्वरूपात विलीन झाले. काहीही असो, एक द्रष्टा धर्मप्रचारक गेला येवढे खरे.

### उपदेश

बसवेश्वरांनी जन्मभर वीरशैव संप्रदायाचा प्रसार केला. शिवभक्तांना शिस्त लावली, जातिभेदाचे निर्मूलन, विधवाविवाह, मिश्रविवाह, बालविवाहाला बंदी इत्यादी ज्या सुधारणा आपण विसाव्या शतकात केल्या त्याच बसवेश्वरांनी बाराव्या शतकात करण्याचा सफल प्रयत्न केला, म्हणूनच त्यांना द्रष्टे म्हणायचे त्यांनी आपल्या वीरशैव किंवा लिंगायत पंथात आठ मुख्य विधी सांगितले. (१) धर्मगुरूंना मान द्यावा (२) गुरूंची आज्ञा पाळावी (३) गुरूंच्या पायाचे तीर्थ घ्यावे. (४) आपल्या अंगावर रुद्राक्ष धारण करावे. (५) कपाळाला भस्म लावावे, (६) चांदीच्या अगर लाकडाच्या पेटीत शिवलिंग ठेवून ते सतत गळयात बांधावे. (७) शिवाची पूजा केल्याशिवाय अन्नग्रहण करू नये. (८) 'ॐ नमः शिवाय' असा शिवाचा जप करावा. असा हा लिंगायत किंवा वीरशैव संप्रदायाचा श्रेष्ठ व द्रष्टा कर्तबगार प्रसारक शके ११२० मध्ये शिव स्वरूपात विलीन झाला.

# १०. महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधर



## मला यात्रेला[1] जायचं आहे

"बाबा मला रामटेकच्या यात्रेला जायचं आहे" हरपाळदेवाने विचारले. विशालदेव म्हणाले, "कसा जाणार तू? रामटेक यादवांच्या अमलाखाली आहे. यादव आपले शत्रु आहेत अशा धामधुमीच्या काळात न जाणं बरं." पण हरपाळदेवाने आपला हट्ट

सोडला नाही. शेवटी विशालदेवांनी आपल्या एकुलत्या एक मुलाचा हट्ट पुरविला. बरोबर दोनशे सैनिक देऊन मुलाला यात्रेला पाठविले. यात्रा हे केवळ निमित्त होते. खरं म्हणजे हरपाळदेवाला घर सोडून जायचं होतं पण एवढा सुखाचा संसार सोडून जायचं कारण काय ? विशालदेव आणि माल्हाईसासारखे प्रेमळ आई-वडील; कमळाइसासारखी सुंदर, सुस्वभावी बायको आणि इतर ऐश्वर्य सोडून हा का निघाला होता? त्याला कारणही तसंच घडलं होतं.

**जन्म**

गुजरातेत भडोचच्या राजाकडे विशालदेव प्रधान होते. माल्हाइसासारखी प्रेमळ बायको त्यांना मिळाली होती. हातांत सत्ता होती. जवळ पैसा होता, कुठल्याच प्रकारच्या सुखाची कमतरता नव्हती. त्या सुखाला मात्र एक गालबोट होतं आणि ते म्हणजे त्याना मुलगा नव्हता. शेवटी उतार वयात त्यांना मुलगा झाला. त्याचं नाव ठेवलं हरपाळदेव. उशीरा झालेला व एकुलता एक मुलगा म्हणून त्याचे सर्व प्रकारचे लाड होत. प्रधानपुत्राच्या इतमामाने त्याचं सर्व शिक्षण झालं. थोडयाच काळात त्याने शस्त्रास्त्र आणि इतर विद्यात प्रगती केली. वयात आल्यावर विशालदेवांनी कमळाइसा नावाच्या सुंदर मुलीशी त्याचं लग्न लावून दिलं. त्याचं सौख्य आता पूर्ण शिगेला पोचलं होतं. कमळाइसेच्या प्रेमळ सहवासात तो सर्व प्रकारची सुखं भोगू लागला. पुढे लौकरच त्याला पुत्ररत्न झाले.

## जुगारामुळे परिवर्तन

पण सूत्रचालकाची सूत्रे वेगळयाच तऱ्हेने हलत होती. पैशाच्या धुंदीमुळे त्याला जुगारासारखे वाईट व्यसन लागले. एकदा जुगार खेळता खेळता तो सगळे डाव हरला. जवळचे पैसे, अलंकार

सर्व घालवून बसला. शेवटी त्याने ५०० रु. उसने घेऊन लावले. पण तेही गमावून बसला. निराश मनाने तो कमळाइसाकडे आला व म्हणाला, "मी जुगारात सर्व पैसे हरलो. एकाचे ५०० रु. उसने घेऊन लावले तेही हरलो. त्याला मी गोपालकृष्णाचे वचन देऊन पैसे परत करतो म्हणून सांगितले. मला त्याचे पैसे परत करायचे आहेत तर तू मला पाचशे रुपये दे." —कमळाइसाला हे ऐकून वाईट वाटले. तिने पैसे तर दिले नाहीतच उलट जुगाराच्या व्यसनाबद्दल पतीची खूप निर्भत्सना केली. हरपाळदेवाचे निराश मन अधिकच निराश झाले. तो विचार करू लागला की खरे सुख कशात आहे ? विचार करता करता त्याला कळून चुकले की जुगार, खाणे-पिणे वगैरे कशातही खरे सुख नाही. खऱ्या सुखाच्या शोधार्थ गौतमबुद्धाप्रमाणे तोही बाहेर पडला.

## हरपाळदेवाचे पलायन

दोनशे सैनिकांना घेऊन हरपाळदेव रामटेकच्या यात्रेला निघाला. घरी निरोप सांगण्यासाठी म्हणून तो एकेका सैनिकाला पाठवून देई. शेवटी त्याच्याबरोबर दोनच सैनिक राहिले. त्यांना आपल्या धन्याचे मनोगत कळले. रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून ते धन्याची जपणूक करू लागले. एक क्षणभरही त्याला मोकळे सोडीत नसत. एका रात्री एका धर्मशाळेत तिघेही उतरले. बऱ्याच दिवसांच्या जागरणामुळे दोन्ही सैनिकांना झोप लागली. तेवढी संधी पाहून हरपाळदेव पळून गेला. उठल्यावर सैनिकांनी खूप शोध केला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही

## सद्गुरूची भेट

हिंडता हिंडता हरपाळदेव रितपूरला आला. तेथे एका झाडाखाली एक विरागी पुरुष दिसला. दाढी व जटा वाढल्या होत्या.

मळके वस्त्र गुंडाळले होते. आकाशाकडे पहात कशाचे तरी चिंतन चालले होते. त्याचं नाव गोविंद प्रभु किंवा गुंडम राऊळ. हरपाळदेवाने त्यांना नमस्कार केला. त्याच्या मनातील गोंधळ गोविंदप्रभूंनी ओळखला. त्याला गुरुमंत्र दिला. आपल्या तपश्चर्येचा अनुभव, ज्ञान दिले. त्याचे नाव चक्रधर ठेवले, आणि जगाच्या कल्याणासाठी लोकांना उपदेश करायला सांगितले. चक्रधर तेथून निघाला.

## तपश्चर्या

चक्रधर सालबर्डीच्या डोंगरावर आले. तेथे शंकराचे रम्य देऊळ होते. तेथील शांतता आणि निसर्गरमणीयता चक्रधरांना फार आवडली. तेथे शंकराच्या पायाजवळ बसून त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. नंतर लोकांना उपदेश करण्यासाठी ते बाहेर पडले. सत्य, अहिंसा आणि समता ह्या तीन तत्त्वांचा उपदेश त्यांनी केला तो सामान्य लोकांना कळावा म्हणून मराठीमधूनच केला. प्रथम त्यांना विंध्य पर्वतातील गोंड लोक भेटले. चक्रधरांनी त्यांना उपदेश केला. त्यांच्यातील भांडणे मिटविली. चक्रधरांचा उपदेश ऐकून, त्यांची गोरीपान आणि तेजस्वी मूर्ती पाहून गोंडांच्या मनात आदर उत्पन्न झाला. ते आपल्यातील घास चक्रधरांना देऊ लागले. जवळपास गुरे राखणारे गुराखी सुद्धा चक्रधराकडे येत. चक्रधर त्यांची सुख-दुःखे ऐकून घेई. कोणी आजारी असले तर त्याला औषधपाणी देई. कोणी चोरी केली किंवा खोटे बोलला तर त्याला शिक्षा करी. पण तितक्याच प्रेमाने जवळ पण करी. चक्रधर गुराख्यांचा देव बनला होता. पण चक्रधर साऱ्या भारताचे होते. त्यांना एका ठायी थोडेच राहता येणार ?

## चांभाराला भाजून मारले

ते अनेक ठिकाणी हिंडत आणि उपदेश देत. त्यांचा उपदेश ऐकून एक चांभार समता, सत्य आणि अहिंसा या तत्त्वाप्रमाणे वागू लागला आणि इतरांनाहि तसाच उपदेश करू लागला इतर चांभारांना हे आवडले नाही. त्यांचे मत होते की आपण चांभार या नीच जातीत जन्मलो. आपण ब्राह्मणाच्या बरोबरीचे कसे बनणार? समता ही आपल्यासाठी नाही. हा चांभार धर्म बुडवतो आहे. म्हणून त्याला इतरांनी चुनखडीच्या ढिगात बसविले व वरून पाणी ओतले. अशा रीतीने त्या चांभाराला भाजुन मारले चक्रधराच्या शिष्यातील हा एक हुतात्माच ठरला.

## अहिंसेचा उपदेश

चक्रधर अहिंसेला फार महत्त्व देत. ते सर्वांशी समानतेने वागत. कोणाला मनानेही दुखवीत नसत. एकदा शिकारी पाठीमा लागल्यामुळे एक ससा त्यांच्या पायांत घुटमळू लागला. त्यांनी त्याला उचलून घेतले, अभय दिले. शिकारी ससा मागायला आले चक्रधरांनी ससा दिला नाही. उलट त्यांनाच 'तुम्ही करता ही चूक आहे' असे पटवून दिले. त्यांना अहिंसेचा उपदेश केला. त्या उपदेशाचा परिणाम एवढा झाला की, त्या शिकाऱ्यांनी 'निरपराध प्राण्यांची हत्या करणार नाही' अशी प्रतिज्ञा केली. पशूंना बळी देण्याच्या सुद्धा ते विरुद्ध होते. एकदा एका देवळात बळी दिला जात होता. चक्रधरांनी खूप सांगितले पण लोकांनी ऐकले नाही. शेवटी आपल्या डोळ्यादेखत तरी पशुहत्या नको म्हणून ते बाहेर निघून गेले.

## वाघ शांत झाला

अहिंसा तत्त्वाचे पालन केल्यामुळे त्यांच्या अंगात अलौकिक सामर्थ्य आले होते. एकदा रानातून जात असता एका जाळीत वाघाची पिले खेळत होती. चक्रधरांनी ती उचलली आणि त्यांना ते खेळवू लागले. इतक्यात वाघीण आली तिने पाहिले की हा प्रेमाने खेळवतो आहे. वाघीण काहीही न करता निघून गेली. एका गावातील देवळात रात्री वाघ येत असे. चक्रधर त्या देवळात जाऊ लागले. लोकांनी सांगितले की तुम्ही या देवळात राहू नका. या देवळात रात्रीचा वाघ येत असतो. चक्रधर म्हणाले, "वाघ मला काहीही करणार नाही." चक्रधर देवळाच्या ओटचा-वरच वसले. रात्रीं वाघ आला. चक्रधरांनी प्रेमळ नजरेने त्याच्या-कडे पाहिले. नजरेला नजर भिडली. वाघ शांत झाला व निघून गेला. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी विचारले की वाघ आला होता का? चक्रधरांनी सांगितले, "वाघ आला होता. तो तसाच परत निघून गेला. उद्यापासून तो देवळात येणार नाही." अहिंसेमुळे एवढे सामर्थ्य चक्रधरांना प्राप्त झाले होते. ते म्हणत की तुमच्या मनात जर वाईट भावना नसतील तर कोणीही तुम्हाला काही करू शकत नाही.

## संप्रदायाची स्थापना व प्रसार

त्यांना धनाचाही लोभ नव्हता. आपल्याला मिळालेली दक्षिणा ते परोपकारासाठी देऊन टाकीत. गोंडवन, तेलंगण, कर्नाटक वगैरे भागात त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार केला. शेवटी ते पैठ-णला आले. पैठण म्हणजे दक्षिणेतील काशी, विद्वानांचे माहेरघर, चक्रधरांनी पैठणला शके ११८५ मध्ये संन्यास घेतला व आपल्या

संप्रदायाचा प्रसार करू लागले. त्यांच्या संप्रदायाला 'महानुभाव संप्रदाय' म्हणतात. या संप्रदायात जातिभेद मानीत नाहीत. स्पृश्यास्पृश्य, सोवळे, ओवळे, उच्च-नीच हा भेदभाव नाही. सगळ्यांशी सारखेपणाने वागायचे. शरीराने वाणीने व मनाने कोणाचीही हिंसा करायची नाही. कोणाला दुखवायचे नाही. सर्वांशी प्रेमाने वागायचे. खरे बोलायचे अशी यांची शिकवण होती. ते आपला उपदेश मराठीत देत तेथेही त्यांना अनेक शिष्य मिळाले. नागदेवासारखा व्यसनी माणूसही त्यांचा शिष्य बनला, नागदेवाची विधवा आई आबाइसा, विधवा बहीण उमाइसा, एक विधवा चुलत बहीण महदाइसा या सर्व चक्रधराच्या शिष्या बनल्या. चक्रधरांच्या मठात अनाथ, निराश्रित सर्वांना आश्रय मिळे. महादइसा ही त्यांची पट्टशिष्या, मराठीतील प्रसिद्ध कवयित्री आहे. हिने रचलेले " धवळे " मराठी वाङ्मयात अमर झाले आहेत.

## चक्रधरांचा छळ

पैठणात चक्रधरांचे महत्त्व वाढले. त्यांच्या मठात लोकांची रीघ लागू लागली. मोठमोठे राजेरजवाडे सुद्धा त्यांच्या भजनी लागू लागले. पैठणच्या पंडितांना ही गोष्ट पाहवली नाही. त्यांनी चक्रधरांना नष्ट करण्याचे ठरविले. एकदा विषाने माखलेली सुपारीची खांडे त्यांना खायला दिली. पण काहीही परिणाम झाला नाही. दुसऱ्यांदा विषप्रयोग केला. पण चक्रधरांनी विष ओकून टाकले. चक्रधर जिवन्तच राहिले. शेवटी पैठणच्या ब्राह्मणांनी कारस्थान रचले. हा धर्म बुडवतो. लोकांना अनाचाराच्या मागे लावतो म्हणून राजाचे कान फुंकले. राजाने चक्रधरांना पकडण्याची आज्ञा दिली. राजाचे सैनिक आले सगळा मठ उध्वस्त केला. नागदेवांनी प्रतिकार सुरू केला पण चक्रधरांनी प्रतिकार करू दिला नाही. ते

आपण होऊन सैनिकांच्या स्वाधीन झाले. चक्रधरांना राजापुढे आणण्यात आले. तशा परिस्थितीतही त्यांनी विरोध केला नाही. अहिंसा तत्त्वाप्रमाणे वागले. ते राजाला एवढेच म्हणाले "मी एक भिक्षू मी काय वाईट केले याचा विचार करा." राजाचे मन द्रवले नाही. त्याने चक्रधरांचे नाक कान कापण्याची शिक्षा दिली.

### बलिदान

इतकी विटंबना केली तरी चक्रधर शिष्यांना धीर देत फिरत होते. त्यांनी अखेरची निरवानिरव केली. नागदेवाला आपल्या नंतर आचार्य नेमले. सर्व शिष्यांना दुःख झाले. नागदेवाच्या आणि महदाइसेच्या दुःखाला तर अन्तच नव्हता. राजाची पालखी आली. भोयांनी पालखी नदीकिनारी नेली. चक्रधर खाली उतरले. चाण्डाळांनी शस्त्र उपसले. चक्रधरांनी मान खाली वाकविली एका घावातच त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. आपल्या संप्रदायाच्या प्रसारासाठी चक्रधरांनी हसत हसत बलिदान केले.

### संप्रदायाची अभियता

पुढे महानुभाव संप्रदाय लोकांना अप्रिय झाला. कारण त्यात जातीयता नव्हती. उच्चनीच भाव नव्हता. आपल्या संप्रदायाच्या रक्षणासाठी या संप्रदायातील लोकांनी बंधने घालून घेतली. आपली ग्रंथरचना सांकेतिक लिपीत केली. सामान्य लोकांना ही सांकेतिक लिपी न कळल्यामुळे महानुभाव संप्रदायाचा प्रसार विशेष झाला नाही सामान्य जनांना तो अपरिचित राहिला पण कार्याच्या दृष्टीने मात्र महानुभाव संप्रदाय हा खरोखरच महान होता.

* *

# चोखा मेळा



सोयराबाई दारात सचिंत उभीं होती. मनात एकच काळजी होती की मला मुलगा केव्हा होईल ? निपुत्रिकाचे जिणे व्यर्थ. परमेश्वरा मला मुलगा दे. त्याच वेळी दारात एक म्हतारा ब्राह्मण आला व म्हणू लागला "बाई मी दोन दिवसांचा उपाशी आहे. मला काही तरीं जेवायला दे."

सोयराबाई म्हणाल्या की, महाराज आपण ब्राह्मण, आम्ही महार. मी कशीं तुम्हाला जेवायला देऊ ?" "नाही मला फार भूक लागली आहे, काहीतरी वाढ" ब्राह्मण म्हणाला.

"पण ब्राह्मणाला बाटविले म्हणून लोक आम्हाला मारतील." सोयराबाईने उत्तर दिले.

सोयराबाईने अनेक वेळा सांगितले पण तो ब्राह्मण काही ऐकेना, शेवटी सोयराबाई घरात गेली व त्या ब्राह्मणाला घरातून दही-भात आणून दिला. दहीभात खाऊन सन्तुष्ट झालेल्या ब्राह्मणाने विचारले की, " बाई मी तुम्हाला काय देऊ ?"

"काही नको. फक्त तुमच्या ताटातील दहीभाताचीं उष्टी शिते मला द्या " सोयराबाई म्हणाली.

ब्राह्मणाने उष्टी शिते दिली व तो म्हणाला, " ही खा तुला मुलगा होईल. "

सोयराबाई ही चोखामेळयाची पत्नी. घरी आल्यावर तिने सर्व हकिकत आपल्या नवऱ्याला सांगितली. एका ब्राह्मणाला वाटविल्या बद्दल चोखामेळा तिला रागावले सुद्धा. नंतर योग्य काळाने सोय-राबाईला मुलगा झाला. त्याचे नाव कूर्ममेळा.

चोखोबांचा जन्म सुमारे सहाशे वर्षांपूर्वी पंढरपुराजवळ असलेल्या मंगलवेढे या गावात झाला. त्यांना निर्मला नावाची एक बहीण होती. त्यांच्या मेव्हण्याचे नाव होते. बंका महार. हे सर्वच कुटुंब पांडुरंगाची भक्ति करीत असे. चोखामेळयाची पत्नी सोयराबाई ही पांडुरंगाची भक्त असल्याने दोघांचा संसार चांगला चालला होता. चोखामेळयाला लहानपणापासूनच पांडुरंगांची भक्ति आवडत होती. तो संत नामदेवांची कीर्तने ऐकत असे. त्याने त्यांनाच आपले गुरु मानले. मनाला समाधान मिळावे म्हणून त्याने ज्ञानेश्वरां-बरोबर तीर्थयात्रा केली पण मनाची तळमळ शान्त झाली नाही.

" बहुत हिंडलो देशदेशान्तरा
परन्तु मन नाही स्थिर झाले कोठे ! "

चोखोबा महान भगवत् भक्त होते. संसारात त्यांचे लक्ष्य नव्ह-तेच. दुपारपर्यंत आपल्या जातीची कामे करून ते स्नान करीत व

नंतर भगवंताची पूजा–अर्चा करीत, भजनात मग्न होत असत. चोखोबा शुद्ध रहात असत. ते कधीही मांस खात नसत. परमेश्वराचे ते लाडके भक्त होते. एकदा तर पांडुरंग प्रत्यक्ष घरी जेवायला आल्याचा उल्लेखही त्यांनी एका अभंगात केला आहे.

त्यांची पंढरपूरची वारी कधी चुकली नाही. पंढरपूर त्यांना माहेरासारखे वाटे. भूवैकुंठ वाटे. पंढरपुरला जाऊन काय उपयोग ? पांडुरंगाचे बाहेरून दर्शन घ्यावे लागे. जातीने महार असल्याने कोणी मंदिरात प्रवेश करू देत नसे. मंदिरातील पांडुरंगाची साजरी गोजरी सावळी मूर्ति पहाता येत नसे. मन अस्वस्थ होऊन जाई. चोखोबा पुजाऱ्यांची वारंवार आळवणी करीत असे अहो माझी जात महाराची असली तरी माझा भाव शुद्ध आहे. माझ्या भक्तीला वाईट म्हणू नका. मला आत येऊन परमेश्वराचे दर्शन घेऊ द्याहो !

चोखा डोंगा परी रस नोहे डोंगा.
काय भुललासी वरलिया रंगा !

मला एकदा तरी आत येऊ द्या. पण चोखोबाचीं विनवणी ऐकतील तर ते बडवे कसले ? पुजाऱ्यांनी चोखोबाला आंत येऊ दिले नाही. चोखोबाच्या मनाची अस्वस्थता वाढतच राहिली पांडुरंगाला आपल्या भक्ताचे दु:ख पाहवले नाही. त्याचे अन्त:करण कळवळले. एका रात्री पांडुरंगाने चोखोबाला गाभाऱ्यात नेले. बराच वेळ त्यांच्याशी गुजगोष्टी केल्या. आपल्या गळ्यांतील रत्नहार त्याच्या गळ्यात घातला. तुळशी, बुक्याचा प्रसाद देऊन त्याला घरी पोचवले. चोखोबाला अतिशय आनंद झाला. पण पुजारी सकाळी उठून पाहतात तो देवाच्या गळ्यात रत्नहार नाही. सगळीकडे गोंधळ

उडाला. शोधाशोध सुरू झाली. देवाच्या गळ्यातील रत्नहार कोणी चोरला ? शोधता शोधता तो रत्नहार चोखोबाच्या गळ्यात सापडला. चोखोबाला त्याची शुद्धही नव्हती. तो पांडुरंगाच्या भजनात रंगला होता. रत्नहार चोरला म्हणून व देव बाटविला म्हणून पुजाऱ्यांनी त्याला खूप मारले. चोखोबाने पांडुरंगाची प्रार्थना केली, " देवा, माझा काय अपराध आहे ? हे बडवे मला मारतात, तू आता मंद चालू नकोस. लवकर धावत ये. "

" धाव घाली विठो आता चालू नको मंद ।
बडवे मज मारिती ऐसा काय तरी अपराध ।। "

चोखोबाची बहिण निर्मला व मेहुणा बंका दोघेही महान भगवत् भक्त होते. घरच्या दारिद्रयामुळे चोखोबा जेव्हा उदास होत, तेव्हा ते महिना महिना बहिणीच्या घरी जाऊन रहात. एकदा सोयराबाईचे दिवस भरले होते. बाळंतपणासाठी घरात सामान नव्हते की जवळ पैसा नव्हता. चोखोबा वैतागले व बहिणीच्या घरी जाऊन राहिले. भक्ताची सर्व काळजी परमेश्वराला असते. पांडुरंग स्वतः चोखोबाच्या बहिणीचे निर्मलाचे रूप घेऊन आले. बरोबर सर्व सामान आणले होते. महिनाभर राहून सोयराबाईचे बाळंतपण करून निघून गेले. चोखोबाला आल्यावर ही हकिकत कळली. तेव्हा त्याला फार वाईट वाटले. त्याचे डोळे भरून आले. माझ्यासाठी देवाला किती त्रास पडला !

पण भक्तांची संकटे देव स्वतःची संकटे समजून दूर करतो. पुजारीलोक चोखोबाला फार त्रास द्यायचे. एकदा एका झाडाखाली पांडुरंग व चोखोबा जेवायला बसले होते. झाडाआडून पुजारी पहात होता. गडबडीत देवाच्या पितांबरांवर दही सांडले. जवळच्या

झाडावर एक कावळा 'काव् काव्' करीत होता. चोखोबा त्याला म्हणाले, " अरे तुला कळत नाही कां? पांडुरंग येथे जेवायला बसले आहेत आणि तू 'काव् काव्' करतोस? चल इथून दूर हो! पुजाऱ्याला वाटले की चोखोबा आपल्यालाच म्हणाले. त्याने पुढे येऊन चोखोबाच्या फाड्‌कन थोबाडीत मारली. पण नंतर गाभाऱ्यात जाऊन पाहतो तो देवाच्या पितांबरावर दही सांडले होते आणि देवाचा गाल सुजला होता. पुजाऱ्याने धावत जाऊन चोखोबाची माफी मागितली तेव्हा देवाच्या गालावरची सूज उतरली.

चोखामेळा पांडुरंगाचा एकनिष्ठ भक्त होता. तो एकटाच नव्हे तर त्याचे सारे कुटुंब विठ्ठलभक्त होते. त्याची पत्नी सोयराबाई ही विठ्ठलभक्त होती. तीही अभंग रचीत असे. हरिजन कुळात जन्म घेऊनही आपल्या प्रेमळ वाणीने आणि निर्मळ आचरणाने याने विठ्ठलाची भक्ति केली. त्याने आपल्या भक्तीने पांडुरंगालाही वश करून घेतले होते. पण ह्या महान् भगवद्‌भक्ताचा अन्त मात्र एका दु:खद घटनेमुळे झाला.

मंगळवेढ्याला गावकुसू घालण्याचे काम चालले होते. सरकारने गावातले सगळे महार वेठींला धरले. पण कुणीतरी चुगली केली की चोखोबा आलेले नाहीत. ताबडतोब भजनात दंग असलेल्या चोखोबाला पकडून आणण्यात आले. व त्याला कामाला लावण्यात आले. एकीकडे विठ्ठलाचे नामस्मरण करीत करीत चोखोबा काम करीत होते. पण याच वेळी काय दुर्दैव ओढवले कोण जाणे? अचानक ते गावकुसू कोसळून पडले. त्याखाली चोखोबा, इतर महार व बरीच माणसे चिरडून मेली.

या घटनेनंतर आठ दिवस उलटले. पांडुरंग बेचैन झाले. ते नामदेवास म्हणाले की, नामदेवा माझा भक्त आज आठ दिवस मातीच्या

ढिगाऱ्याखाली गाडला गेलाय रे, निदान त्याच्या अस्थि तरी गोळा करून घेऊन ये. नामदेव म्हणाले, देवा इतके लोक चिरडले गेले, त्यात नेमक्या चोखोबाच्या अस्थि मला कशा सापडणार? पांडुरंग म्हणाले, "प्रत्येक हाड कानाला लाव. ज्या हाडातून 'विठ्ठल, विठ्ठल' असा आवाज येत असेल ते चोखोबाचे हाड. इतका तो आणि मी एकरूप झालो होतो."

नामदेवाने तो उद्योग केला त्याने सर्व हाडे कानाला लावली. ज्यातून 'विठ्ठल विठ्ठल' आवाज येत होता त्या अस्थि गोळा केल्या. महाद्वारात त्या अस्थींना समाधी देण्यात आली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या द्वारी नामदेवाच्या पायरीजवळ ही समाधी आहे. प्रत्येक वारकरी आधी या दोन समाधींचे दर्शन घेतो आणि मगच आत प्रवेश करतो.

चोखोबांनी विठ्ठल भक्तीचा प्रसार केला. त्यांनी आपल्या उदाहरणाने दाखवून दिले की, भक्तीत जातिभेदाला जागा नाही. कोणत्याही जातीत जन्माला आला. तरी तुम्हाला परमेश्वराची भक्ति करता येईल. भक्तिमार्ग सर्वांसाठी खुला आहे. चोखोबा आपले कर्तव्य कर्म सांभाळून विठ्ठल भजन करीत. त्यांनी पंढरपूरची वारी कधी चुकवली नाही. अनेक संकटे मानहानि सोसूनही त्यांची श्रद्धा कधी विचलीत झाली नाही. त्यांचे ३५० अभंग गाथ्यात मिळतात. ते सर्व अभंग भक्तिरसाने ओथंबलेले आहेत. असा हा महान् विठ्ठल भक्त वैशाख वद्य पंचमीला विठ्ठल स्वरूपात विलीन झाला.

# संत रोहिदास



आपण काशीयात्रेला जाऊ या कां? पुंडलिकाच्या बायकोने विचारले. पुंडलिक बायकोचा कोणताहि शब्द खाली पडू देत नव्हता. त्याने ताबडतोब होकार दिला. पुंडलिकाच्या आई-वडिलांना मात्र समाधान वाटले. कारण पुंडलिक व त्याची बायको रोज त्यांना छळत असत. पुंडलीकानें विचारल्यावर त्याच्या आई वडिलांनी सांगितले की, तुम्ही जा दोघे. आम्ही म्हातारे झालो आहोत. आम्हाला काही चालवणार नाही. पुंडलीकाची बायको म्हणाली, 'दळभद्री मेले, चांगली काशीयात्रा घडवून आणतोतर येत नाही." शेवटी नाईलाजाने दोघे तयार झाले,

पुंडलिकाला काशीला जायला कोणते वाहन मिळाले नाही. शेवटी त्याने बायकोला खांद्यावर घेतली व आई-वडिलांना दोरी बांधून त्यांना फरफटत चालविले. प्रवास करता करता सर्व जण

काशी जवळच्या गावात आले. त्याचवेळी पुंडलिकाचा जोडा तुटला. त्याने लोकाजवळ चांभाराची चौकशी केली. त्यावेळी त्याला लोकांनी रोहिदासाचे नाव सांगितले. पुंडलिक रोहिदासाकडे गेला. पण तेथील दृश्य पाहून पुंडलिकाला हसू आले. रोहिदासाच्या मागे पाळणा बांधला होता. पाळण्यात त्याचे आई–वडिल बसले होते. पाळण्याची दोरी रोहिदासाच्या शेंडीला बांधली होती. रोहिदासाची मान हलली की, पाळण्याला झोका बसे आणि आईवडिल आनंदित होत. अशा रीतीने आईबापांची सेवा रोहिदास करीत होता. पुंडलिकाने त्याची चेष्टा केली व त्याच्यापुढे जोडा शिवण्यासाठी टाकला.

रोहिदासाने जोडा शिवला. पुंडलिकाच्या आईवडिलांचे हाल पाहून रोहिदासाला फार वाईट वाटले. त्याने पुंडलिकाला सांगितले की, महाराज आपण ब्राह्मण आहात. मी आपल्याला उपदेश करावा येवढा माझा अधिकार नाही पण आईवडिल देवाप्रमाणे असतात. आपण त्यांचे कां हाल करता ?

पुंडलिकाला राग आला. तो म्हणाला "अरे चांभारा, तुला या चांभारचौकशा कशाला ? तूं पुढे पाहून आपले काम कर. आम्ही काशीयात्रेला निघालो आहोत.

रोहिदास म्हणाला, महाराज माझी आपल्याला एक विनंती आहे. माझे काही काशीला जाणे घडत नाही. आपण जाताच आहात तर माझा हा पैसा गंगामाईला अर्पण करा पुंडलिकाने कुचेष्टेने तो पैसा घेतला. काशीला आल्यावर स्नान, दर्शन वगैरे सर्व झाले. पुंडलिक परत जायला निघाला. तेव्हा त्याला त्या पैशाची आठवण झाली. त्याने तो पैसा गंगामाईला अर्पण केला पण काय आश्चर्य! गंगामाईने हात वर करून तो पैसा घेतला व

प्रसाद म्हणून एक पृथ्वीमोलाचे कंकण दिले. पुंडलिकाने ते घेतले. त्याच्या मनात लोभ निर्माण झाला. त्याने ते कंकण रोहिदासाला देण्याऐवजी स्वत:जवळ ठेवले.

ते कंकण मोडून पैसे करण्यासाठी तो सावकराकडे गेला. सावकार म्हणाला की हे कंकण भारी आहे. १। लाख रुपये याची किंमत होईल. आपण राजाकडे जाऊन हे कंकण विकू दोघेही कंकण घेऊन राजाकडे आले. अत्यत तेजस्वी व चकाकणारे तें कंकण पाहून राजा खूष झाला. सव्वालाख रूपये देऊन त्याने ते कंकण खरेदी केले. राजाने ते कंकण राणीस दिले. ते सुंदर कंकण पाहून राणीही खूष झाली. ती राजाला म्हणाली, " महाराज, हे एक कंकण घेऊन मी काय करू ? याच्या जोडीचे दुसरे कंकण मिळाले तर निदान दोन्ही कंकणे घालता तरी येतील. राणीचे म्हणणे राजाला पटले. त्याने ताबडतोब दोघांना बोलावले व सांगितले की, मी मागाल तितकी रक्कम द्यायला तयार आहे. पण मला दुसरे कंकण आणून द्या. कारण त्याशिवाय राणी अन्न ग्रहण करणार नाही. आता हे दोघे दुसरे कंकण कोठून आणून देणार ? पुंडलिकाने सांगितले की, माझ्याजवळ एक कंकण होते ते दिले. माझ्याजवळ दुसरे कंकण नाही. राजाने त्याला चोर समजून अटकेत ठेवले व सांगितले की तू जर दुसरे कंकण आणून दिले नाहीस तर तुला चोरीच्या आरोपाखाली फाशी दिले जाईल. पुंडलिक घाबरला. त्याने राजाला सर्व खरी हकिकत सांगितली. शेवटी सर्वजण रोहिदासाकडे आले. पुंडलिक म्हणाला, रोहिदासा माझे प्राण वाचव. गंगेने तुला दिलेले कंकण मी स्वत:जवळ ठेवले. आता जर दुसरे कंकण दिले नाही तर राजा मला फाशी देईल. मला सोडव." रोहिदास म्हणाला, " मी एक गरीब चांभार मी

तुला सोन्याचे कंकण कोठून देणार. तू गंगामाईकडे जा व माग "पुंडलिक म्हणाला, अरे माझ्यासारख्या पापी माणसाला गंगामाई कंकण कसे देईल ? तूच प्रार्थना कर. "

पुंडलिकाची दीन अवस्था पाहून रोहिदासाला दया आली. त्याने गंगेची प्रार्थना केली. पुन्हा ते आश्चर्य घडले. रोहिदासाच्या जवळच्या पाण्याच्या कुंडात गंगा आली. कुंडातून तिने हात बाहेर काढला व तिने रोहिदासाला दुसरे कंकण दिले. रोहिदासाने ते पुंडलिकाला दिले. पण आता पुंडलिकाला आपल्या वागण्याचा पश्चाताप झाला. त्याने ते कंकण राजाला दिले व स्वत: रोहिदासाचा शिष्य बनला.

अशा या रोहिदासाबद्दल अनेक दन्तकथा उत्तर हिंदूस्थानात प्रसिद्ध आहेत. रोहिदासाच्या कालाबाबतीत विद्वानात मतभेद आहेत. रोहिदासाच्या सांप्रदायिकांचे मत आहे की रोहिदासाचा जन्म इसवी सन १४१४ साली झाला. लहानपणापासून त्याला ईश्वरभक्तीचा छंद होता, आईबापांना त्याची ईश्वर भक्ती पाहून त्याची काळजी वाटू लागली. संसारात मन रमविण्यासाठी त्यांनी त्याचे लग्न करून दिले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याची ईश्वरभक्ती वाढतच होती. बायकोही त्याच्या स्वभावाला पोषक मिळाली. रोहिदास जोडे शिवण्याचा धंदा करी. आईबापाची सेवा करून दिवसभर नामस्मरण करी. संसार गरिबीचा पण समाधानाचा होता.

संत रोहिदास हे रैदास, रायदास, रुईदास, रविदास इत्यादि नावाने प्रसिद्ध होते. नावे अनेक असली तरी व्यक्ति अेकच. रोहिदासाच्या वडिलांचे नाव रघू व आईचे नाव करमा होते. काशीजवळील मंडूर गावी रोहिदासाचा जन्म झाला. लहानपणी

त्यांना शिक्षण मिळाले नाही. पण संतांच्या सहवासाने व देशाटनाने रोहिदासाचे ज्ञान वाढत होते. वयाच्या बरोबर ईश्वराची भक्तीही वाढत होती. घरची गरिबी असूनही मनाला कधी पैशाचा लोभ शिवला नाही. एके दिवशी एका साधूने भगवंताचा प्रसाद म्हणून काही मोहरा रोहिदासास दिल्या आणि साधू अदृश्य झाला. रोहिदासाला कळेना की या मोहरांचे काय करावे ? त्याने ईश्वराची प्रार्थना केली. "देवा, या मोहरांचे मी काय करूं. या मोहरा परत घेऊन जा." शेवटी परमेश्वराला प्रत्यक्ष यावे लागले. त्याने येऊन सांगितले, "अरे रोहिदासा, पैशाशिवाय तुझे कसे चालणार? तुला ह्या मोहरा घ्यायलाच पाहिजेत." शेवटी रोहिदासाने पैसे घेतले. पण त्याचा खर्च स्वत:साठी केला नाही. त्या पैशातून एक सुंदर मदिर बांधले व एक ब्राह्मण पुजारी ठेवला. चांभाराच्या देवळात ब्राम्हण पुजारी. त्यामुळें त्यावेळचे ब्राम्हण चिडले. त्यांनी बादशाहकडे तक्रार केली. बादशहाने रोहिदासाला पकडून आणण्याची आज्ञा केली. रोहिदास बादशहापुढे उभा राहिला. पण त्याचा शान्त व निर्भय चेहरा पाहून बादशहा प्रभावित झाला व त्याला काही न विचारता सोडून दिले.

मीराबाईने सुद्धा रोहिदासाला गुरु मानले होते. चितोडला कुंभश्यामाचे मंदिर बांधले व तेथे हे गुरूशिष्य राहू लागले. त्यानंतर बराच काळ लोटला. एकदा रोहिदास पूजाअर्चा करून परतत असता कांही अंध विश्वासी लोकांनी त्यांना छेडले. खांद्यावर जानवे नाही म्हणून त्यांची टिंगल केली रोहिदासाला त्याचेवाईट वाटले. त्यांनी खांदा फाडून-चामड्याच्या आतील ज्ञानाचे जानवे दाखविले. ते जानवे इतके तेजस्वी होते की ते तेज पाहून ब्राह्मणांचे डोळे दिपले त्यांनी डोळे मिटून घेतले. त्यांना रोहिदासाचा

मोठेपणा पटला. पण त्याचवेळीं रोहिदासांनी इहलोकची यात्रा संपविली. आजही कुंभश्यामाच्या मंदिरात त्यांची स्मृति जतन केलेली आहे. ती जागा 'रविदासकी छतरी' म्हणून प्रसिद्ध आहे.

अशा रीतीने सन्त रोहिदासाचे चरित्र अनेक दन्तकथांनी भरलेले आहे. जातीने चांभार असूनसुद्धा आपल्या भक्तीने त्याने परमेश्वराला वश करून घेतले आणि जणू आपल्या उदाहरणावरून दाखवून दिले की भक्तीत जातीला महत्त्व नाही. भक्त कोणत्याही जातीचा असो, त्याची भक्ति श्रेष्ठ आहे. त्याची बहुतेक पदे हिन्दीत रचलेली आहेत. हा उत्तर भारतीय सन्त असून सुद्धा महाराष्ट्रीयन लोक त्याला आपला मानतात. त्याने लोकांना नामस्मरणाचा व सदाचाराचा उपदेश केला. त्याचे सांगणे होते की, आईबापाची सेवा करावी, सज्जनांच्या सहवासात रहावे. प्रामाणिकपणे काम करून संसार करता करता ईश्वराची भक्ति करावी. त्याने नामस्मरणाला अधिक महत्त्व दिले होतें. त्याने ढोंग व बाह्यावडम्बर यांचा विरोध केला.

रोहिदासाच्या मृत्युबद्दलही अनेक दंतकथा आहेत. काही लोक मानतात की, कुंभश्यामाच्या देवळात हा निजधामाला गेला. काही समजतात की हा सदेह गुप्त झाला. काहींचे मत आहे. याने योग मार्गाने देहत्याग केला. काहींची कल्पना आहे की, म्हातारपणी काशीतच याला सुखासमाधानाने मृत्यु आला. असा हा रोहिदास अनेक दंतकथांचा विषय बनला होता. याने जरी देहत्याग केला तरी खेड्यातील जनतेच्या मनात हा उपदेश रूपानें जीवंतच आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २०३ दिनांक ......
विषय ... ९/०

## महान मानव

✱ ✱

मनुष्य हा आपल्या कृतीनें महान होतो आपल्या त्यागानें परंपरा निर्माण करीत असतो. अशाच परंपरेंतील महान मानवांचा आदर्श पुढील पिढीपुढें राहतो. ते देहाने आपल्यांत रहात नाहीत. पण कृतीने अमर बनतात अशा महान मानवाची ओळख म्हणजेच आमची खालील पुस्तके होत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | आदर्श गुरुशिष्य | | ले. दत्ता. जी. कुलकर्णी | ०–५० |
| (२) | दोन महान संत | | ,, | ०–५० |
| (३) | दोन महान समाजसेवक | | ,, | ० ५५ |
| (४) | दोन कर्तबगार माणसं | | ,, | ०–५० |
| (५) | दोन महान देशभक्त | | ,, | ०–५० |
| (६) | सेनापती व लोकनायक | | ,, | ०–५० |
| (७) | दोन तत्त्वनिष्ठ देशसेवक | | ,, | ०–५० |
| (८) | महान क्रांतिकारक | भाग १ | श्री. य. शं. कुलकर्णी | ०–५० |
| (९) | ,, | भाग २ | ,, | ०–५० |
| (१०) | ,, | भाग ३ | ,, | ०–५० |
| (११) | ,, | भाग ४ | ,, | ०–५० |

**याच मालिकेत नवीन पुस्तकांची भर पडणार आहे.**

# मजेदार गोष्टींची पुस्तकें

✱ ३१ पुस्तके प्रत्येक चाळीस नये पैसे.

✱ ३१ पुस्तकांचा संच फक्त—बारा रुपये चाळीस पैसे.

आकर्षक इंद्रधनुष्याच्या सप्तरंगांत—३१ कव्हर चित्रे, ७०० पृष्ठें १०० चे वर प्रसंगचित्रे, मोठा टाईप—पुस्तके पाहताच लहान मुले आनंदून जातात. मनोरंजक व बोधप्रद पुस्तकें म्हणजेच

**आकर्षक प्लॅस्टिक बॅगेमधील—संपूर्ण—सेट**

---

## हाच तो ३१ पुस्तकांचा संच

✱ ✱

| | | |
|---|---|---|
| सोनेरी गाय | जादूची बाहुली | जादूचा मोती |
| जादूचा हिरा | हंसरे झाड | फुलराणी |
| राक्षसाचा पाय | हरिणीचा श्राप | मायाजाल |
| जादूचा मासा | शेवंतीचे फुल | चंद्रशेखर |
| लालपरी | जादूची कोंबडी | शरश्चंद्र |
| कुबडा हकीम | कापसाची किमया | शिरीष कुमार |
| अरे बापरे भूत | कुठे असतो देव | आधारवड |
| उडत्या पादुका | तारानगरी | गलावी राक्षस |
| रोगी राक्षस | बिबानगरी | गंपू पाण्यावरून चालतो |
| बोलणारा पुतळा | गाणारा बुलबुल | विषारी विहीर |
| | लोभाचे प्रायश्चित्त | |

---

**मुलांच्यासाठीं उत्तम ब्रेन टॉनिक म्हणजेच आपला मजेदार गोष्टींचा पुस्तक संच. मुलांच्या हातात द्या व त्याचा प्रत्यय पहाच**

---

मनिऑर्डरने रु. १ [illegible] ानें वरपोंच मिळेल.

BVBK-0400203


राष्ट्रीय
एकात्मता
व सुसंस्कार या साठी
महान
मानव
संच
अगाडे कुलकर्णी
प्रकाशन पुणे २